रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १७ ◆ अंक १५१
www.ramprahar.com

मंगळवार, १७ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

अतिक्रमणाविरोधात पनवेल महापालिका ॲक्शन मोडवर/२
कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र मोहिमेचा रायगडात शुभारंभ/५
बुमराहवर वर्णभेदी टिप्पणी; कॉमेंटेटरने मागितली माफी/८

## एक देश, एक निवडणूक विधेयक संसदेत होणार सादर?



**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान भारतीय जनता पक्षाने मंगळवार (दि. १७) साठी आपल्या खासदारांना तीन ओळींचा व्हिप जारी केला आहे. माध्यमांतील वृत्तानुसार एक देश, एक निवडणूक विधेयक मंगळवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास सादर केले जाऊ शकते तसेच केंद्रीय कायदामंत्री अर्जुन मेघवाल हे बील सादर करणार असल्याचे बोलले जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार 'एक देश, एक निवडणुकी'संदर्भात एनडीएच्या सर्व घटक पक्षांची चर्चा झाली आहे आणि सर्व पक्ष यासाठी अनुकूल आहेत, तर विरोधी पक्ष केवळ राजकीय कारणांसाठीच या विधेयकाला विरोध करत आहेत. हे विधेयक संसदीय समितीकडे पाठवण्यास सरकारची कसल्याही हरकत नाही. महत्वाचे म्हणजे लोकसभेत मंगळवारचा अजेंडा समोर आल्यानंतर या संदर्भात सर्व कयास स्पष्ट होतील.

## पहिल्याच दिवशी 35,788 कोटींच्या पुरवणी मागण्या

# 'लाडक्या बहिणीं'साठी 1400 कोटींची तरतूद

**नागपूर : प्रतिनिधी**




नागपूरमध्ये सोमवार (दि.१६) पासून हिवाळी अधिवेशनास सुरुवात झाली. या अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारकडून पहिल्याच दिवशी ३५,७८८.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. यामध्ये १४०० कोटी रुपयांची तरतूद मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही यापुढेही कायम सुरू राहणार असून याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली आहे. राज्यातील लाडकी बहीण योजनेसाठी १४०० कोटी रुपयांची तरतूद केली त्यांनी म्हटले आहे. योजनेतील तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी हा निधी आहे तसेच मासिक लाभ १५००वरून २१०० करण्याची तरतूद अद्याप करण्यात आली नाही.


मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत या पुरवणी मागण्या मांडल्या. एकूण पुरवणी मागण्यांपैकी सर्वाधिक म्हणजेच सात हजार ४९०.२४ कोटी रुपयांचा निधी हा सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात येणार आहे. त्यातील तीन हजार १९५ कोटी रुपये हे केंद्र सरकारकडून राज्य सरकारला बिनव्याजी देण्यात आले आहेत. हा निधी इमारती, रस्ते आणि पूल बांधण्यासाठी होणार आहे. त्याचप्रमाणे पुरवणी मागण्यांपैकी तीन हजार ५० कोटी रुपयांचा निधी हा मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज अंतर्गत वापरण्यात येणार आहे.

### विधानसभेत मांडलेल्या पुरवणी मागण्या आणि निधीची तरतूद

- सहकारी आणि खासगी दूध संघांना प्रती लिटर पाच आणि सात रुपये अनुदानासाठी ७५८ कोटी
- प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी राज्याचा हिसा म्हणून ८१४ कोटी
- मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेसाठी दोन हजार ७५० कोटी
- यंत्रमाग वस्त्रोद्योग वीज सवलतीसाठी ३०० कोटी
- सरपंच मानधनासाठी १२८ कोटी
- सामाजिक न्याय विभागाच्या योजनांसीठी ८९० कोटी
- आदिवासी विकास विभागाला १८१३ कोटी रुपये
- लाडकी बहीण योजनेसाठी अतिरिक्त १४०० कोटी
- अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी २९० कोटी
- ओबीसी समाजास मोदी आवास घरकुल योजनेसाठी १२५० कोटी
- मुंबई मेट्रो-३साठी ६५५ कोटी
- रस्ते व पुलासाठी १५०० कोटी
- राज्यात इमारती, रस्ते, पूल बांधण्यासाठी ३१९५ कोटी
- वैद्यकीय महाविद्यालयांच्या बांधकामासाठी ११७० कोटी
- राजकोट किल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी ३६ कोटी

## ईव्हीएमच्या मुद्द्यावरून इंडिया आघाडीत मतभेद

■ एनसीनंतर टीएमसीची काँग्रेसवर टीका





**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हरियाणा आणि महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर काँग्रेसने पुन्हा एकदा ईव्हीएमवर खापर फोडायला सुरुवात केली आहे. अनेक नेत्यांनी तर पूर्वीप्रमाणे बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी केली आहे, मात्र याच मुद्द्यावरून इंडिया आघाडीत दोन गट पडल्याचे पहायला मिळत आहे. या मुद्द्यावर इंडिया आघाडीतील मित्रपक्षांनी काँग्रेसवर टीका केली आहे.

नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते व जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यानंतर तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनीदेखील काँग्रेसचे ईव्हीएमवरील आरोप बिनबुडाचे असल्याचे म्हटले आहे. संसद भवन संकुलात सोमवारी (दि. १६) प्रसारमाध्यमांशी बोलताना खासदार बॅनर्जी म्हणाले, ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांकडे याचे पुरावे असतील, तर त्यांनी ते निवडणूक आयोगाकडे सादर करावे. अशा आरोपांमध्ये काही तथ्य नाही, असे मला वाटते. अजूनही कोणाला वाटत असेल की, ईव्हीएम हॅक होऊ शकते, तर त्यांनी निवडणूक आयोगाला सिद्ध करुन दाखववे; अन्यथा असे निरर्थक विधाने करून काहीही साध्य होणार नाही.

जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनीदेखील ईव्हीएमच्या मुद्द्यावरून काँग्रेसवर निशाणा साधला. पीटीआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ओमर म्हणाले, जेव्हा तुम्ही जिंकता, तेव्हा तुम्ही निवडणूक निकाल स्वीकारता आणि जेव्हा तुम्ही हरता, तेव्हा तुम्ही ईव्हीएमला दोष देता. तुमचे १००पेक्षा जास्त खासदार याच ईव्हीएममुळे निवडून आले. तेव्हा तुम्ही पक्षाचा विजय म्हणून साजरा केला. आता निवडणुकीचे निकाल तुमच्या मनासारखे लागले नाही, म्हणून तुम्ही ईव्हीएमला दोष देऊ शकत नाही.

## बीडमधील घटना गंभीर; आरोपींवर कडक कारवाई करणार

### मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती



**नागपूर : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील घटना गंभीर असून सरकारने ती गांभीर्याने घेतली आहे. संबंधित आरोपी व दोषी पोलिसांवर कारवाई करण्यात आली असून या प्रकरणातील आणखी कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.


मस्साजोग (जि. बीड) येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येविषयीच्या विधान परिषदेत उपस्थित झालेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते. ते म्हणाले, या घटनेसाठी सीआयडीची एक विशेष एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तांत्रिक व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार असून फरार आरोपींना लवकरच पकडण्यात येईल.

या प्रकरणात एका पोलीस अधिकाऱ्यास सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले असून एकास निलंबित करण्यात आले आहे. आरोपी कोणत्याही जाती, धर्माचा किंवा राजकीय पक्षाचा असला तरी तसेच कोणत्याही दबावाचा विचार न करता या संदर्भात कडक कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी सभागृहात प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले.

### विरोधकांनी राजकारण करू नये!

बीड आणि परभणी अशा घडलेल्या दोन्ही घटना या गंभीर आहेत. या विषयावर सविस्तर चर्चा करण्याची सरकारची तयारी असून संविधानाचा अपमान सहन केला जाणार नाही. परभणी येथे संविधानाचा अपमान करणारी व्यक्ती ही मनोरुग्ण होती. तरीसुद्धा त्याच्यावर कारवाई करण्यात आली. त्यामुळे विरोधी पक्षाने याबाबत राजकारण न करता अशा घटना रोखण्यासाठी त्यांनी चांगल्या सूचना मांडाव्यात, अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

## उस्ताद झाकीर हुसेन यांना मान्यवरांकडून आदरांजली



**मुंबई : प्रतिनिधी**

तबला जादूगार उस्ताद झाकीर हुसेन यांनी ७३व्या वर्षी अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथील रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. ते दीर्घकाळापासून हृदयविकाराने त्रस्त होते. त्यांच्या निधनाने भारतासह जगभरातून शोक व्यक्त होत असून अनेकांना त्यांच्याप्रति श्रद्धांजली व्यक्त केली आहे.

उस्ताद झाकीर हुसेन हे प्रख्यात तबलावादक अल्लारखाँ यांचे पुत्र होते. झाकीरभाईंचे पूर्ण नाव झाकीर हुसेन अल्लारखाँ कुरेशी होते. त्यांनी १९७८मध्ये कथ्थक नृत्यांगना आणि शिक्षिका अँटोनिया मिनेकोला यांच्याशी प्रेमविवाह केला. त्यांना अनिसा आणि इसाबेला अशा दोन मुली आहेत.

उस्ताद झाकीर हुसेन यांच्या निधनामुळे भारताने विशेषतः महाराष्ट्राने आपला अत्यंत लाडका सुपुत्र व संगीत क्षेत्रातील तेजस्वी तारा गमावलाय, असे महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे. (पान २ वर..)

## निवडक


### गांधी घराण्याकडून माझी राजकीय कारकीर्द उद्ध्वस्त -मणिशंकर अय्यर

**नवी दिल्ली :** गांधी घराण्याने माझी राजकीय कारकीर्द घडवली आणि त्यांनीच उद्ध्वस्त केली, असा धक्कादायक खुलासा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांनी केला आहे. मुलाखतीत ते म्हणाले की, मला एकदा राहुल गांधींना वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायच्या होत्या, पण यासाठी मला प्रियंका गांधींना फोन करावा लागला होता तसेच एकदा मी सोनिया गांधींना मेरी ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या तेव्हा मॅडम म्हणाल्या मी ख्रिश्चन नाही. १० वर्षांपासून मला सोनिया गांधींना समोरासमोर भेटण्याची आणि राहुल गांधींसोबत वेळ घालवण्याची एकही संधी दिली गेली नाही.

### कुर्ला बस अपघातातील मृतांचा आकडा आठवर

**मुंबई :** कुर्ला बेस्ट बस अपघातातील मृतांचा आकडा आता आठवर गेला आहे. फजलू शेख नावाच्या जखमी व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरू होते. या अपघातात सुमारे ४० लोक जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## ...म्हणून सुधीर मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळात घेतले नाही



**नागपूर : प्रतिनिधी**

भाजपचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांना नव्या मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. दरम्यान, पक्षातील इतर जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपवण्यात येणार असल्याचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. ते सोमवारी (दि. १६) नागपुरातील विधानभवनाबाहेर बोलत होते.

माझी सुधीर मुनंगटीवार यांच्याशी नीट चर्चा झाली आहे. ते आमचे ज्येष्ठ नेते आहेत. पक्षाने काही लोकांना मंत्रिमंडळात न घेण्यामागे त्यांना काही विशिष्ट जबाबदारी देण्याचा मानस केला आहे. शेवटी पक्ष आणि सरकार या दोन्ही गोष्टी चालवायच्या असतात. त्यामुळे काहीवेळा सरकारमध्ये काम करणारे पक्षात, तर पक्षात काम करणारे सरकारमध्ये काम करतात. सुधीर मुनगंटीवार अतिशय अनुभवी नेते आहेत. आमच्या केंद्रीय नेतृत्वाने त्यांच्याबद्दल काहीतरी विचार करूनच त्यांना मंत्रिमंडळात घेतले नाही, अशी प्रतिक्रिया देत त्यांच्या नाराजीबाबतच्या चर्चांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी पूर्णविराम दिला आहे.

**'नव्या आदेशाची वाट पाहतोय'**

दरम्यान, भाजप नेते सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मी नाराज नाही. पक्षाने जो आदेश दिला, जबाबदारी दिली त्याचे मी पालन केले आहे. मला याची जाणीव आहे की, मी विधानसभेत आलो असतो तर अनेक जण अनेक प्रश्न विचारतील. त्या प्रश्नांची उत्तरे देण्यापेक्षा मौनं सर्वार्थ साधनम् हे मी मानतो तसेच श्रद्धा आणि सबुरी ठेवली पाहिजे. संघटनेच्या नव्या आदेशाची वाट पाहतो आहे.

## मैदानाचे लोकार्पण



**उलवे नोड : सिडकोकडून मोरावे गावासाठी उपलब्ध झालेल्या मैदानाचे लोकार्पण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमास कामगार नेते महेंद्र घरत, कोळी समाजाचे नेते उत्तम कोळी, भाजप गव्हाण जि.प. विभागीय सरचिटणीस मदन पाटील, उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, श्रीकांत म्हात्रे, लहू म्हात्रे, धावजी पाटील, विनायक पाटील, चंद्रकांत म्हात्रे, सचिन म्हात्रे, मयूर म्हात्रे, यज्ञेश भोईर, प्रणय कोळी, संजय पाटील, अमर म्हात्रे, काशिनाथ म्हात्रे, मिलिंद म्हात्रे, चिंतामण गोंधळी, रूपेश ठाकूर, उमेश ठाकूर, संकेत भोईर आदी उपस्थित होते.**

## कार्यशाळा म्हणजे निरंतर शिकण्याचे माध्यम -सोमनाथ घार्गे

### अलिबाग येथे पत्रकारांसाठी उपक्रम



**अलिबाग : प्रतिनिधी**

विविध विभागांमार्फत आयोजित होणाऱ्या कार्यशाळा निरंतर शिकण्याचे माध्यम असतात, मात्र अनेकदा या कार्यशाळेबाबत लोकांचा दृष्टीकोन उदासिनतेचा असतो. ज्या वेळी मी परिपूर्ण आहे, मला सगळे येते, आता मला काहीही नवीन शिकण्याची गरज नाही असे एखाद्या व्यक्तीला वाटू लागते. तेव्हापासून त्याच्या ऱ्हासाला सुरुवात होते. त्यामुळे निरंतर शिकण घेत राहणे ही काळाची गरज आहे, असे मत रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी व्यक्त केले. ते अलिबाग प्रेस असोसिएशनच्या माध्यमातून आयोजित पत्रकार कार्यशाळेत बोलत होते.

अलिबागमधील चिंतामणराव केळकर विद्यालयात रविवारी (दि. १५) झालेल्या या कार्यशाळेच्या उद्घाटन सोहळ्याला आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य मानसी दळवी, ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम उपस्थित होते. जिल्ह्यातील शंभरहून अधिक पत्रकारांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदवला.

या जगात परिपूर्ण असे कोणीही नसते. ज्या व्यक्तीला प्रगती करायचीय, पुढे जायचे असेल त्याला जगात काय चालले आहे याची माहिती असणे गरजेचे आहे. काहीतरी नवीन शिकायची ऊर्मी हवी. पत्रकारितेची साधने बदलत आहेत. त्यात गतिमानता येत आहे. त्यामुळे पत्रकारितेतील बदल समजून घ्यायचे असतील तर त्यासाठी कार्यशाळा उपयुक्त ठरतात, असे पोलीस अधीक्षक घार्गे म्हणाले.

पत्रकार हा महत्त्वाचा घटक आहे. समाजातील वेगवेगळ्या लोकांचे भेटून, त्यांचे प्रश्न मांडण्याचे काम ते करत असतात. पत्रकारांनी मांडलेल्या प्रश्नांनी समाजात जागरूकता निर्माण होते. त्यामुळे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून असलेले पत्रकारितेचे महत्त्व नाकारता येणार नाही. सुजाण आणि सक्षम समाज घडवायचा असेल तर त्यासाठी जाणते पत्रकार निर्माण व्हायला हवेत. त्यासाठी पत्रकारांच्या कार्यशाळा उपयुक्त ठरू शकतात, असे आरसीएफचे कार्यकारी संचालक नितीन हिरडे यांनी सांगितले.

आपत्ती काळात रायगड जिल्ह्यातील पत्रकारांनी प्रशासनाला मोलाची साथ दिल्याचे जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे यांनी या वेळी सांगितले, तर ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम यांनी पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपाबाबत भाष्य केले. (पान २ वर..)

## नवी मुंबई मेट्रोला तीन आयएसओ मानांकने

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याच्या निकषावर सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मेट्रो परिचालन सेवेला आयएसओ ९००१, आयएसओ १४००१ आणि आयएसओ ४५००१ मानांकने प्राप्त झाली आहेत. अशा प्रकारची तीनही आयएसओ मानांकने प्राप्त करणारी नवी मुंबई मेट्रो ही राज्यातील एकमेव मेट्रो सेवा ठरली आहे.



*आयएसओ मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता, शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविण्यात आला आहे. नगर विकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणी स्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.*
**-विजय सिंघल,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

नवी मुंबई मेट्रो लाईनला परिचालनाच्या पहिल्याच वर्षी तिन्ही आयएसओ प्रमाणपत्र मिळाली आहे. अशी तिन्ही आयएसओ प्रमाणपत्र मिळालेली ही महाराष्ट्रातील एकमेव मेट्रो लाइन आहे. महा मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत ब्रिटीश स्टॅण्डर्ड्स इन्स्टिट्यूशन (बीसएसआय)द्वारे प्रदान केलेले प्रमाणपत्र सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल यांना सुपूर्द करण्यात आले.

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३पासून मेट्रोसेवेचे परिचालन सुरू झाले असून या मेट्रोसेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. आयएसओ मानांकनाद्वारे सिडको मेट्रोच्या उत्कृष्ट परिचालनासह नवी मुंबईतील नागरिकांना प्रवासाचा सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांवर शिक्कामोर्तब झाले आहे.

ब्रिटिश मानक संस्था बीसएसआयतर्फे देण्यात येणारी तीन आयएसओ मानांकने सिडको मेट्रोला, महा मेट्रो रेले कॉर्पोरेशनच्या माध्यमातून प्राप्त झाली आहेत. (पान २ वर..)

# लोकराज्य दुर्मिळ अंकांचे डिजिटायजेशन करावे -प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

## विधान भवन परिसरात अंकांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन | मंत्री, आमदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भेट देऊन केले कौतुक

**नागपूर : प्रतिनिधी**

लोकराज्यचे दुर्मिळ अंक हे माहितीचा अमूल्य ठेवा असून त्याचे जतन व संवर्धन होण्याकरिता या अंकांचे डिजिटायजेशन करण्याच्या सूचना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी विधानभवन परिसरातील लोकराज्य दुर्मिळ अंक प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभात केले.

नागपूर–अमरावती विभाग संचालक कार्यालयाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनास मंत्री, आमदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भेट देऊन राज्याच्या गौरवशाली परंपरेच्या माहितीचा ठेवा असणाऱ्या या प्रदर्शनाचे कौतुक केले.

उद्घाटनप्रसंगी नागपूर–अमरावती विभागाचे संचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे, लोकराज्यचे संपादक तथा संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क) दयानंद कांबळे, छत्रपती संभाजीनगर विभागाचे संचालक (माहिती) किशोर गांगुर्डे, वरिष्ठ पत्रकार धर्मेंद्र जोरे, नागपूर जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, वर्धा जिल्हा माहिती अधिकारी



रवि गिते, चंद्रपूर जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर आदी यावेळी उपस्थित होते.

महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी प्रदर्शनाची पाहणी केली. तसेच या दुर्मिळ अंकांचा ठेवा अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी डिजिटायझेशन आणि अन्य आधुनिक पद्धतीचा उपयोग करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. दुर्मिळ अंकांच्या मांडणीचे कौतुकही त्यांनी केले.

प्रदर्शनात वैविध्यपूर्ण माहितीचा ठेवा असणारे दुर्मिळ १९६४ पासूनचे अंक येथे प्रदर्शित करण्यात आले आहेत. संत ज्ञानेश्वर आणि कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त प्रकाशित अंक, मराठी संगीत रंगभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, यशवंतराव चव्हाण, मराठवाडा विकास व सांस्कृतिक अंक, स्वातंत्र्यदिन विशेषांकासह महाराष्ट्र राज्यातील महान व्यक्तीमत्वे, सांस्कृतिक, भौगोलिक, आर्थिक असा वैविध्यपूर्ण ठेवा तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती असणारे १५० अंक या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आले आहेत.

विधीमंडळ अधिवेशनाचा पहिलाच दिवस असल्याने विधानभवन परिसरात विधानसभा व विधान परिषद सदस्यांची लगबग होती. वाटेतच लोकराज्य दुर्मिळ अंकांचे आकर्षक प्रदर्शन दिसताच त्यांनी प्रदर्शनास भेट दिली. या वेळी पाहणी करून प्रतिक्रियाही नोंदविल्या. याठिकाणी उभारण्यात आलेल्या सेल्फी स्टँडवर पोज देऊन छायाचित्रेही काढून घेतली.

भेट देणाऱ्यांमध्ये मंत्री, ॲड. आशिष जायस्वाल, आमदार सर्वश्री प्रविण दरेकर, चित्रा वाघ, बाबुसिंग राठोड, अबु आझमी, श्रीजया चव्हाण, सुहास बाबर, देवराव भोंगळे यांचा समावेश आहे. गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, वनविभागाचे उपसचिव विवेक होशिंग, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे अवर सचिव धिरज अभंग यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही प्रदर्शनास भेट दिली. अधिवेशन कालावधीमध्ये दररोज सकाळी ९ वाजल्यापासून हे प्रदर्शन पाहण्यास उपलब्ध राहणार आहे.

# पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात क्षयरोग शोधमोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२५पर्यंत भारत देश क्षयरोगमुक्त करण्याचे ध्येय ठेवले आहे. शाश्वत विकासाचे स्वप्न साकार करताना क्षयरोग मुक्त भारत करण्याच्या उद्देशाने १०० दिवसीय क्षयरोग मोहिम देशातील ३४७ जिल्हांमध्ये राबविण्यात येत आहे. त्यामध्ये रायगड जिल्ह्याचा समावेश आहे.

जास्तीत जास्त नवीन रूग्णांना त्वरीत उपचाराखाली आणणे, क्षयरुग्णांचा मृत्यूदर कमी करणे, क्षयरोग सहवासितांना क्षयरोग प्रतिबंधक औषधोपचार देणे तसेच मोठ्या प्रमाणावर क्षयरोगाबाबत जनजागृती करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरात (दि.७ ) पासून या



मोहिमेस सुरुवात झाली आहे. ह्या मोहीमेंतर्गत संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अतिजोखमीच्या भागांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. या सर्वेक्षणातून अतिजोखमीची संख्या एकत्रित करण्यात येत आहे. पुढील १०० दिवसात जोखीमग्रस्त भागांतील संशयितांची तपासणी करण्यात येत असल्याची माहिती मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.

तपासणीमध्ये अतिसंशियित संभाव्य रूग्णाचे छातीचे एक्स रे आणि क्षयरोग चाचणी करण्यात येत आहे. आज पर्यंत ७ हजार ९०५ संशयित रूग्णाची तपासणी करण्यात करण्या आली आहे. यामध्ये तळोजा कारागृहातील २ हजार ७४० कैद्यांची तपासणी करण्यात आली. तसेच एकूण १ हजार १७९ संभाव्य रूग्णांचे छातीचे एक्सरे करण्यात आले आहेत. याबरोबरच १२५ संभाव्य रूग्णाची क्षयरोग चाचणी करण्यात आली आहे.

## राहुल गेठेंकडे अतिरिक्त आयुक्तपदाचा तात्पुरता कार्यभार

**नवी मुंबई : प्रतिनिधी :**

नवी मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. अमोल शिंदे यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्याने शासनाने त्यांना नवी मुंबई पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदावरून कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्याऐवजी अतिक्रमण उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांच्याकडे तात्पुरत्या स्वरूपात अतिरिक्त आयुक्त २ या पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांच्याकडे मूळ अतिक्रमण विभागाचा कर्यभत कायम राहणार असल्याचे आयुक्तांनी काढलेल्या पत्रकात म्हंटले आहे.

# अतिक्रमणाविरोधात पनवेल मनपा ॲक्शन मोडवर : चारही प्रभागांमध्ये तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे रस्त्यांवर, फूटपाथवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाले, व्यावसायिक व खाद्य व्यवसायिकांवर आयुक्त मंगेश चितळे यांनी तोडक कारवाई करण्याबाबत कठोर सूचना दिल्या. फूटपाथ तसेच रस्त्यांवरील वाढत्या अतिक्रमणामुळे वाहतुकीला व पादचाऱ्यांना चालण्यास अडथळा निर्माण होत असल्याने महापालिकेच्या वतीने तोडक कारवाईची मोहीम हाती घेतली आहे.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त रविकिरण घोडके, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, अतिक्रमण विभाग प्रमुख व अधिक्षक सदाशिव कवठे, प्रभारी अधिक्षक रोशन माळी, प्रभारी अधिक्षक जितेंद्र मढवी, प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील, प्रभारी अधिक्षक अमर पाटील उपस्थित होते.

महापालिका कार्यक्षेत्रात भरत असलेल्या अधिकृत बाजाराव्यतिरीक्त अनधिकृत आठवडी बाजारांवर व रस्त्यांवरती वाहतुकीस अडथळा आणून सुरू असलेल्या अनधिकृत खाद्यपदार्थांच्या गाड्या अगर स्टॉलवर तोडक कारवाई करून सिलेंडर जप्त करण्याबाबत आयुक्त महोदयांनी उपस्थितांना सूचना दिल्या.

महापालिका कार्यक्षेत्रात गेल्या आठवड्यापासून अनधिकृत व्यवसायिकांविरोधात मोठी तोडक कारवाई करण्यात येत असून खारघरमध्ये जलवायू रोडवरती



अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांमुळे वाहतुक कोंडी होत असल्याने याठिकाणी तोडक कारवाई केली. तसेच खारघर मधील सेक्टर १९मध्ये मार्केट मध्ये रस्त्यावरती अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांवर तसेच अनधिकृत हातगाड्यांवर जेसीबीच्या मदतीने तोडक कारवाई करण्यात आली.

टोलनाका हायवेवर अनधिकृत व्यवसायिकांवर कारवाई करून फुटपाथ व रस्ता मोकळा केला. कळंबोलीमध्ये रस्त्यावर अनधिकृत भाजीचा, आईस्क्रीमचा, फुल विक्रीचा, खाद्यपदार्थ विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यावर अतिक्रमण विभागाने तोडक कारवाई करून सर्व सामन जप्त केले. रोडपाली कमानीजवळ अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर तोडक कारवाई करण्यात आली. प्रभाग समिती ब अंतर्गत खांदा कॉलनी न्यू पनवेल फुटपाथ वरील अनाधिकृत स्टॅन्ड व बॅनर काढण्यात आले. हायवेवरील सर्व हेल्मेट विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. तसेच भीमा कॉम्प्लेक्स येथील अनधिकृत टपरींवर कारवाई करण्यात आली.

तळोजा फेज १व नावडे फेज २ मध्ये फूटपाथवरती खाद्यपदार्थांच्या दुकानाबाहेर अतिक्रमण करून विकल्या जाणाऱ्या अनधिकृत खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सवरती अतिक्रमण विभागाच्या साह्याने कारवाई केली.शनिवारी मार्केट रोड वरती अनधिकृत व्यवसायिकांना बसण्यास मनाई करून रस्ता वाहतूकीसाठी मोकळा ठेवण्यात आला. रविवार मार्केट बंद ठेवण्यात आले व मार्केटमध्ये अनधिकृतपणे व्यवसाय करु दिला नाही.

या बरोबरच खांदेश्वर येथील फुटपाथवर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांवर अतिक्रमण विभागाच्यावतीने कारवाई करून सर्व सामन जप्त करण्यात आले. कामोठेमध्ये सेक्टर ७,८ येथील अनधिकृत हातगाडींवर कारवाई करून ॲक्सिस बँक समोरील चौकात त्या तोडण्यात आल्या. याबरोबरच कामोठ्यातील संत तुकाराम महाराज मार्गावरील फूटपाथवर तसेच मेन रोडवर अनधिकृत फळविक्रत्यांवर तोडक कारवाई करण्यात आली. मेन रोडवरील दुकानदारांनी दुकानाबाहेर ठेवलेले सामान जप्त करण्यात आले.

पनवेलमधील उरण नाका व लाईन आळी येथे रस्त्यावर व फूटपाथ वर विक्री करणाऱ्यांवर कारवाई करून माल जप्त करण्यात आला.तसेच टपाल नाका, बालाजी मंदिर रोड, नवीन पनवेल स्टेशन परिसरात कारवाई करून सामान जप्त करण्यात आला आहे.

> **रस्त्यावर तसेच फूटपाथवर अनधिकृत फ्लेक्स, बॅनर ,होर्डिंग लावल्यास त्यांचा पंचनामा करून गुन्हा दाखल करण्यात येणार आहेत. त्यामुळे महापालिकेची परवानगी घेऊनच अधिकृत जागेवरच फ्लेक्स, बॅनर ,होर्डिंग लावावेत तसेच अनधिकृत फेरीवाले व अनधिकृत आठवडी बाजार या विरोधातील मोहीम आणखी तीव्र करणार आहे.**
> **–मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महानगरपालिका**

# क्रिकेट स्पर्धेसाठी शालेय प्रशासनाकडून होत असलेल्या अडचणी दूर कराव्यात

## खांदा कॉलनी क्रिकेट असोसिएशनची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महात्मा शाळेच्या मैदानावर आयोजित करण्यात येणाऱ्या क्रिकेट स्पर्धांसाठी शालेय प्रशासनाकडून होत असलेली अडचण दूर करावी, अशी मागणी खांदा कॉलनी क्रिकेट असोसिएशनने पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या संदर्भात खांदा कॉलनी क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अभिषेक भोपी, उपाध्यक्ष रोहित कोळी यांनी निवेदन दिले आहे. खांदा कॉलनीमध्ये मोठ्या प्रमाणात शहरीकरण झाले असून खेळासाठी कोणतेही मैदान उपलब्ध नाही. महात्मा शाळेचे एकमेव मैदान हे खेळण्यासाठी वापरले जाते. या मैदानावर विशेष करून क्रिकेट हा खेळ जास्त प्रमाणात खेळला जात असून परिसरातील खेळाडूंच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा तसेच चांगल्या दर्जाचे क्रिकेट खेळता यावे यासाठी दर रविवारी असोसिएशनच्या माध्यमातून क्रिकेट स्पर्धा आयोजित केल्या जातात.

या स्पर्धा पारदर्शीपणे पार पाडाव्यात तसेच परिसरातील प्रतिभावंत खेळाडूंचा खेळ जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहचून त्यांच्या खेळाला उभारी मिळावी या हेतूने काही स्पर्धा यु–ट्युबद्वारे थेट प्रक्षेपित करण्यात येत असतात, परंतु स्पर्धा आयोजित करत असताना महात्मा शाळेच्या प्रशासनाकडून अनेकवेळा असहकार्याची भूमिका घेत विरोध केला जात असल्याने स्पर्धेच्या आयोजनात अनेक अडचणी निर्माण होत असतात. त्यामुळे खेळाडूंच्या उज्वल भवितव्याचा विचार करून शाळेच्या मैदानावर होणाऱ्या क्रिकेट स्पर्धासाठी शालेय प्रशासनाकडून होत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी सहकार्य करावे, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

## माणगाव ग्रामीण पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**माणगाव : प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रात रायगड जिल्ह्यात अग्रगण्य असणाऱ्या माणगाव शहरातील माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.उतेखोल ता.माणगाव या पतसंस्थेचा सन २०२५ च्या दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा शुक्रवार (दि.१३) रोजी संस्थेचे चेअरमन आनंद यादव यांच्या हस्ते व संस्थेचे संचालक,व्यवस्थापक व कर्मचारी वर्ग यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. संस्थेतर्फे अत्यंत चांगल्या प्रकारे विविध सण,उत्सव,राशी,भविष्य,सरकारी सुट्ट्या यांचा उल्लेख करीत दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आल्याने अनेक मान्यवरांनी तसेच संस्थेचे भागधारक,खातेदार,हितचिंतक यांनी संस्थेला विशेष धन्यवाद दिले आहेत.

## दत्त जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री गुरुदत्त जन्मोत्सव ग्रामस्थ मंडळ मोहोपाडा व शिवनगर यांच्यावतीने मोहोपाडा बाजारपेठेतील श्री दत्त मंदिरात जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्ताने सकाळी ६ ते ७ वाजता अभिषेक, सकाळी ९ ते ११ वाजता श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी २ ते ३ वाजता श्री दत्त प्रासादीक महिला भजन मंडळाचा संगीत भजनाचा कार्यक्रम, दुपारी ३ ते ४ वाजता किशोर लोहार यांचे तबलावादक भजन, दुपारी ४ ते ६ वाजता श्री दत्त जन्माचे हभप वामन महाराज भोईर यांचे सुश्राव्य किर्तन, सायंकाळी ६ ते ७ वाजता हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम झाला.मंदिर मोहोपाडा बाजारपेठेत असल्याने दिवसभर भक्तांची लांबलचक रांग लागल्याचे दिसून आली. रात्री ९:३० ते १०;३० वाजता पालखी मिरवणुक मोहोपाडा गावातून पुन्हा श्री दत्त मंदिरात अशी काढण्यात आली. या वेळी ग्रामस्थांसह परिसरातील भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला..

पान १ वरुन

## उस्ताद झाकीर हुसेन यांना मान्यवरांकडून आदरांजली

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंवेदना व्यक्त करताना, प्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांच्या निधनाने तबल्याचा ताल हरपला आहे. तबल्याच्या नादमाधुर्याने संबंध जगातील रसिक श्रोत्यांना एका समेवर आणणारा महान सुपुत्र आपण गमावला आहे, असे नमूद केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, भारतीय अभिजात संगीताचा समृद्ध खजिना सातासमुद्रापार दोन्ही हातांनी उधळणारे प्रतिभावान संगीतकार आणि तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांचे जाणे, संपूर्ण तालविश्वाचाच ताल चुकवणारे आहे, अशा शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवारांनीदेखील उस्ताद जाकीर हुसेन यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केलाय. आपल्या पोस्टमध्ये त्यांनी, उस्ताद जाकीर हुसेन यांच्या निधनामुळे जागतिक आणि भारतीय संगीत क्षेत्रात भरून न निघणारे नुकसान झाले आहे. मी उस्तादजींच्या स्मृतीला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि आप्तस्वकियांच्या दुःखात सहभागी आहे, असे म्हटले आहे.

दरम्यान, भजनसम्राट अनुप जलोटा यांनी व्हिडीओ शेअर करून उस्ताद झाकीर हुसेन यांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांनी म्हटले की, उस्तादजी आता राहिले नाहीत. त्यांच्या जाण्याने संगीत जगताचे मोठे नुकसान झाले आहे. तबल्याचा उल्लेख जेव्हाही होतो, तेव्हा भारताला त्यांच्या नावाने ओळखले जाते. मी प्रार्थना करतो त्यांना ईश्वरचरणी स्थान मिळावे आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाला या दुखाशी लढण्याची शक्ती मिळावी. त्याचबरोबर संगीतकार ए.आर. रेहमान, गायक सोनू निगम आदींनीही आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. याशिवाय सिने क्षेत्रातील तारे–तारकांनीही दु:ख व्यक्त केले आहे.

## कार्यशाळा म्हणजे निरंतर शिकण्याचे माध्यम –सोमनाथ घार्गे

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार वैभव चाळके यांनी बातमीची भाषा आणि व्याकरण याबाबत मार्गदर्शन केले, तर दुसऱ्या सत्रात मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी पत्रकारितेच्या जगभरात असलेल्या संधी कशा हेरता येऊ शकतात याबाबत पत्रकारांशी संवाद साधला. कार्यशाळेच्या अंतिम सत्रात मानसोपचारतज्ञ डॉ. सागर मुंदडा यांनी मनातील ताण–तणावाचे व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन केले. शेवटी पत्रकारांना चिंतामणराव केळकर विद्यालयाचे अध्यक्ष अमर वार्डे आणि आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी संतोष वझे यांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर यांनी, सूत्रसंचलन महेश पोरे व भारत रांजणकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सचिव राजेश भोस्तेकर यांनी मानले.

## नवी मुंबई मेट्रोला तीन आयएसओ मानांकने

आयएसओ ९००१:२०२५ मानांकन हे नवी मुंबई मेट्रोची उच्च दर्जाची सेवा, प्रवाशांचे समाधान आणि परिचालनाची कार्यक्षमता वाढवणे या निकषावर प्राप्त झाले आहे. आयएसओ १४००१:२०१५ मानांकन मेट्रो परिचालनाच्या शाश्वत पद्धतींचा अवलंब करून पर्यावरणावरील परिणाम कमी करणे, संसाधनांची कार्यक्षमता वाढवणे आणि त्या प्रदेशातील पर्यावरणाचे जतन करणे या निकषावर प्रदान करण्यात आले आहे, तर आयएसओ ४५००१:२०१८ मानांकन मेट्रो परिचालनामध्ये सहभागी कर्मचारी व कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षितता जपणे, आरोग्य व सुरक्षाविषयक नियमांचे काटेकोरपणे पालन करून कामाच्या ठिकाणी सुरक्षित पर्यावरण सुनिश्चित करणे या निकषावर प्रदान करण्यात आले आहे.

सिडकोतर्फे महा मेट्रोच्या माध्यमातून नवी मुंबई मार्ग क्र. १वरील मेट्रोच्या परिचालन व देखभाली संबंधित विविध बाबींकरिता पद्धती आणि नियमांची काटेकोरपणे व सातत्याने अंमलबजावणी करण्यात आली आहे. आयएसओ मानांकनांद्वारे जागतिक मानकांची पूर्तता करण्याच्या आणि मेट्रो सेवेची गुणवत्ता सुधारण्याच्या सिडकोच्या प्रयत्नांवर मोहोर उमटविण्यात आली आहे. सिडकोच्या मेट्रोसेवेला मिळालेले आयएसओ मानांकन हे देशातील मेट्रो प्रणालींकरिता आदर्श ठरणार आहे.


## दुखवटा

### तारामती ठाकूर



**नागोठणे :** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते खडू ठाकूर व वांगणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा नागोठणे विभाग सहकारी भात गिरणीचे माजी सभापती प्रभाकर महादू ठाकूर यांच्या मातोश्री तारामती महादू ठाकूर (रा.वांगणी,ता.रोहा) यांचे शनिवार दि.१४ डिसेंबर वृध्दापकाळाने वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात खंडू महादू ठाकूर, प्रभाकर महादू ठाकूर हे दोन मुले व हिराबाई लाड, निर्मला चाळके,हेमा भोईर,गुलाब करंजे या चार मुली तसेच सुना,जावई,नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### धर्मराज जाधव



**पनवेल :** पनवेल तालुक्यातील कराडे बुद्रुक गावातील सामाजिक कार्यकर्ते धर्मराज लक्ष्मण जाधव यांचे सोमवारी (दि.१६) अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अंत्यविधीवेळी विविध क्षेत्रातील व पंचक्रोशीत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कै. धर्मराज जाधव यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि.२६) तर तेरावे रविवारी (दि.२९) राहत्या घरी होणार आहे.


## निवडक

### करंजाडे येथून महिला बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक महिला कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. माधुरी ज्ञानदेव कदम (३३ रा.सेक्टर १ करंजाडे) असे या महिलेचे नाव असून रंग गोरा, उंची पाच फुट चार इंच, अंगाने सडपातळ, चेहरा गोल, नाक सरळ, डोळे काळे असून, अंगात गुलाबी कुर्ती व काळी लेगिझ तसेच निळे स्वेटर घातलेले आहे. तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पो.हवा.आर.के.केणी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेलमधून वृद्ध व्यक्ती बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून ७८ वर्षीय वृद्ध इसम कुठेतरी निघून गेल्याने ते हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मरगु रिवोप्पा विटकर (७८ रा.करंजाडे) असे या वृद्ध इसमाचे नाव असून रंग काळा-सावळा, उंची अंदाजे पाच फुट तीन इंच, अंगाने सडपातळ, चेहरा गोल, नाक सरळ, डोळे काळे असून अंगात हिरवा शर्ट व काळी पॅन्ट घातलेली आहे. यांच्याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा.पोलीस अधिकारी हनुमंत अहिरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### गहाळ मोबाईलद्वारे काढले पैसे

**पनवेल :** एका डॉक्टरांच्या गहाळ झालेल्या मोबाईलमधून अज्ञात चोरट्यांनी दोन लाखांची रक्कम काढून घेतल्याची घटना कळंबोलीमध्ये घडली आहे. नवीन पनवेल परिसरामध्ये राहणारे एक डॉक्टर हे कळंबोली येथे कामानिमित्त गेले असताना तेथील बस स्टॅण्ड लगतच्या पाण्याच्या टाकीजवळ त्यांचा मोबाईल गहाळ झाला होता. गहाळ झालेला आपला मोबाईल फोन त्यांनी सगळीकडे शोधला असता तो मिळून न आल्याने त्यांनी दुसरा मोबाईल घेवून आपले दैनंदिन कामकाज सुरू केले. सदर मोबाईल हा एका चोरट्याच्या हाती लागल्याने त्याने डॉक्टरांच्या मोबाईल गैरवापर करून त्यांच्या दोन खात्यातून इंटरनेटद्वारे दोन लाख चार हजारांची रक्कम परस्पर काढून घेतली. ही बाब डॉक्टरांच्या लक्षात येताच त्यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली आहे.

### तरुणीला ४८ हजारांचा गंडा



**पनवेल :** बँकेतून बोलत असल्याचे भासवून एका महिलेने एका तरुणीला क्रेडीट कार्डला लागलेला प्रोटेक्शन चार्ज रद्द करण्याच्या बहाण्याने तिच्याकडून संपूर्ण माहिती घेऊन तिच्या क्रेडीट कार्डमधून ४८ हजारांची रक्कम परस्पर काढून घेतल्याची घटना कळंबोली वसाहतीमध्ये घडली आहे. २२ वर्षीय तरुणी ही कळंबोलीमध्ये राहत असून ती एका खासगी कंपनीत कामाला आहे. या तरुणीचे आयसीआयसीआय बँकेत खाते असून त्याच बँकेचे तिच्याकडे क्रेडीट कार्ड आहे. एका अज्ञात महिलेने तिला बँकेतून बोलत असल्याचे भासवून तिच्याकडून तिची आवश्यक असणारी माहिती घेऊन त्यानंतर मोबाईलवर आलेला ओटीपी मागवून घेतला व तिच्या क्रेडीट कार्डमधून ४८ हजार ६२३ रुपयांची रक्कम काढून घेतली. ही बाब या तरुणीच्या लक्षात येताच तिने याबाबत कळंबोली पोलीस ठाणे, सायबर क्राईम पोलीस ठाणे तसेच बँकेत याची तक्रार दाखल केली आहे.

# पनवेलमध्ये कुसूम अभियानाला प्रारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजातील सर्व लपलेले कुष्ठरुग्ण शोधुन त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्याकरिता आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली १६ डिसेंबर ते २० डिसेंबर कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र 'कुसूम' अभियान महापालिका कार्यक्षेत्रात राबविले जाणार आहे. या अभियानाचा शुभारंभ आज नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ६ येथे करण्यात आला. या वेळी मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी, माजी नगरसेवक डॉ. अरूणकुमार भगत, कुष्ठरोग अधिकारी डॉ.वैभवी निंबाळकर, वैद्यकिय अधिकारी, परिचारिका उपस्थितीत होते.

या वेळी मार्गदर्शन करताना मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. गोसावी यांनी उपस्थितांना कुष्ठरोगाबाबत माहिती देऊन महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कुष्ठरोगावर उपचार केले जात असल्याचे सांगितले. नागरिकांनी उपचारासाठी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा असे सांगितले. तसेच या अभियानांतर्गत आशा सेविका सर्वेक्षणास आल्यास नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. आपल्या मनोगतात माजी नगरसेवक डॉ. अरूणकुमार भगत यांनी महापालिकेने एकुण २६ प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू करून उत्तम आरोग्य सेवा देत असल्या बद्दल कौतुक करून, समाधान व्यक्त केले.

या विशेष सर्वेक्षणामध्ये वंचित राहणाऱ्या, दुर्लक्षित राहणाऱ्या गटांवर उदा. वीटभट्टी कामगार, खाण कामगार, स्थलांतरित व्यक्ती, बांधकाम मजुर, निवासी,आश्रमशाळेत राहणारे विद्यार्थी, कंपनीत काम करणारे कामगार इत्यादीवर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. या गटातील लोक हे कामाकरिता, मजुरीकरिता लवकर घर सोडतात व उशिरा घरी परत येतात. यामुळे अशा व्यक्तींची आरोग्य तपासणी नियमित सर्वेक्षण अथवा कुष्ठरोग शोध मोहिमेमध्येही होत नाही. ही बाब लक्षात घेवून या घटकांसाठी कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) राज्यात राबविण्यात येत आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात तळोजा कारागृह, खाणी, बांधकामाच्या साईटस्, निवासी आश्रमशाळा अशा विविध ठिकाणी त्वचारोग तज्ज्ञ, आशा वर्कर, बहुद्देशीय कर्मचारी यांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

## रायगड जिल्हा सुरक्षारक्षक मंडळात निरीक्षक पद भरण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्हा सुरक्षारक्षक मंडळाचे कार्यालय खांदा कॉलनीत आहे. या ठिकाणी निरीक्षक हे पद रिक्त असल्याने सुरक्षारक्षकांच्या अडचणीत भर पडत आहे. त्यामुळे निरीक्षक हे पद लवकरात लवकर भरण्याची मागणी होत आहे.

रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळात बरिच वर्षे पदभार सांभाळत असलेल्या निरिक्षक मारुती पवार यांची काही दिवसांपूर्वी बदली होऊन त्यांच्या जागी नियुक्त झालेल्या प्रमोद सावंत हे मंडळात फक्त एक आठवडा थांबुन ते सानपाडा मंडळाच्या निरीक्षक पदावर निघून गेले.

तसेच मंडळावर सचिव पदाचा अतिरिक्त पदभार स्वीकारणार्या स्नेहल माटे ह्यांची पदनियुक्ति होऊन अडीच ते तीन वर्ष उलटूनही आजमितीस स्वतःचे नाम - पदनाम फलक लावण्यास त्यांच्याकडून असमर्थन केले जात असल्याचे दिसत आहे. त्यामुळे मंडळात कामानिमित्त ये-जा करणाऱ्या सुरक्षा रक्षकांना अपुऱ्या माहितीअभावी परत जावे लागत आहे. तसेच सचिव व अध्यक्ष यांनी मंडळात आठवड्यातील एक वार निश्चित करून सर्वांच्या भेटी करिता येत असल्यास सुचना फलकावर दिनांक-वार-वेळ प्रदर्शित करत नसल्याने रायगड जिल्हयाच्या काना कोपऱ्यातुन कामा करिता येणाऱ्या सुरक्षा रक्षक - संघटना - अधिकारी, आस्थापना अधिकारी व इतर नागरिकांना बिन कामाचे परत जावे लागत आहे.

मंडळ अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे मंडळाचे न्यायालयात असलेले खटले मार्गी लावण्यासाठी ई.एस.आय.सी.या शासकिय वैद्यकीय सेवेचा लाभ घेण्यास सुरक्षा रक्षकांना अडचणी भासत आहेत. याकरिता लवकरात लवकर कामगार मंत्रालय तसेच कामगार आयुक्त कार्यालय (बी.के.सी.) येथील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष वेधुन कामगार संघटना प्रतिनिधी, आस्थापना अधिकारी, कामगार वर्गाला न्याय द्यावा, अशी मागणी सुरक्षा रक्षक कर्मचारी करत आहेत.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागातर्फे कार्यक्रम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागातर्फे सोमवारी (दि.१६) व्यवस्थापन संघटनेचे उद्घाटन तसेच इन्फोबीझ मासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

या मासिकाच्या प्रकाशन सोहळ्यासाठी दिपाली सदावर्ते महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर तसेच व्यवस्थापन विभागाच्या प्रमुख डॉ.रीत थुले त्यांच्या हस्ते या मासिकाचे प्रकाशन केले. या वेळी व्यवस्थापन संघटनेचेही उद्घाटन करण्यात आले या संघटनेच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागांमध्ये शिकणाऱ्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळ्या सामाजिक व्यवसायिक पर्यावरणीय उपक्रम घेण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांनी इन्फोबीझ मासिकासाठी दिलेल्या वेगवेगळ्या विषयावरती त्यांनी अतिशय उत्कृष्टरित्या त्यांच्या लेखणीच्या माध्यमातून लेख लिहून ते प्रकाशित केले. या उद्घाटन व प्रकाशन सोहळ्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी, व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभागातील सर्व प्राध्यापकांनी सहकार्य केले.

# गायक उमेश चौधरी यांना सुवर्ण स्वरमंडल प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शास्त्रीय गायनात स्वरमंडल या झंकार वाद्याला एक परंपरा आणि अनन्य साधारण महत्त्व आहे. शास्त्रीय संगीतातील गायक या वाद्याचा उपयोग करत असतात. असाच एक स्वरमंडल पनवेलमध्ये दाखल झाला आहे, विशेष म्हणजे हे स्वर मंडल सुवर्ण अर्थात मौल्यवान अशा २४ कॅरेट सोन्याच्या धातूचा आहे, आणखी एक विशेष म्हणजे तो जगातील पहिला सुवर्ण स्वरमंडल ठरला आहे.

भजन सम्राट निवृत्तीबुवा चौधरी यांचा वारसा अखंडपणे चालवणारे आणि भारतातील नामवंत आग्रा घराण्याचे शास्त्रीय व गायक पं. उमेश चौधरी यांनी जगातील पहिला सुवर्ण स्वरमंडल प्राप्त करण्याचा बहुमान पटकावला आहे. दत्त जयंतीचा सोहळ्याचा योग साधत त्यांना यशवंत महाराज यांच्या हस्ते आणि अध्यात्मिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत



विधिवत प्रदान करण्यात आला.

कोलकता येथील स्वरूप बिस्वास तालुकदार हे स्वर मंडल बनवणारे जागतिक कीर्तीचे कारागिर आहेत. त्यांच्या करागिरीतून साकारलेले हे भारतातीलच नाही तर जगातील पहिले सुवर्ण स्वरमंडल असल्याचे स्वरूप यांनी समाज माध्यमांवर माहिती देताना स्पष्ट केले आहे, आणि अशा प्रकारचा जगातील पहिला वाद्य निर्माण केल्याचा आनंद आणि अभिमानही त्यांनी व्यक्त केला आहे.

पंडित उमेश चौधरी यांनी देशात आपल्या गायन शैलीने शास्त्रीय संगितचा प्रचार व प्रसार केला आहे. रायगड जिल्ह्याचा सुपुत्र म्हणून त्यांनी जिल्ह्याचे आणि पर्यायाने महाराष्ट्राचे नाव नेहमीच उज्वल केले आहे. देशभर कार्यक्रम होत असले तरी त्यांनी कधीच रियाज सोडला नाही, आणि त्याच अनुषंगाने त्यांच्या गायनाला साथ देण्यासाठी सुवर्ण स्वर मंडलाची भर पडली आहे. हा फक्त पनवेल, रायगड, राज्याचाच नाही तर देशाचा अभिमानास्पद स्वरमंडल ठरला आहे.

## खारघरमध्ये आज वक्तृत्व स्पर्धा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सत्याग्रह महाविद्यालय खारघर, नवी मुंबईच्या वतीने संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्ताने मंगळवार आणि गुरुवार १७ आणि १९ डिसेंबर २०२४ रोजी मुबई महानगर प्रदेशातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाद विवाद आणि वत्कृत्व स्पर्धा आयोजित केली आहे.

या स्पर्धात सोशल मीडिया दुधारी तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता एक वरदान, राजकीय पक्ष संविधानाचा गैर वापर करत आहेत? नवीन शैक्षणिक धोरण आर्थिक दुर्बल यांना शाप? निवडणूक अयोग लोकशाहीला तारक? सशक्त भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका या विषयांपैकी एका विषयावर विध्यार्थ्याला भाग घेता येणार असून कोणतीही नोंदणी शुल्क स्पर्धेसाठी नाही.

विजेत्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या स्पर्धकाला अनुक्रमे चार हजार रोख आणि भारताचे संविधान व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केला जाणार असल्याचे प्रा. डॉ. जी.के. डोंगरगावकर यांनी सांगितले. इच्छुकांनी नोंदणी आणि अधिक माहितीसाठी, प्रा.सतीश पवार (९५११२०६०८४) यांच्याशी संपर्क साधावा किंवा कॉलेजच्या मल्टीस्किल डेव्हलपमेंट सेल कडे भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'गुरु दत्तात्रयांचा महिमा अगाध'

**उरण : वार्ताहर**

गुरु दत्तात्रयांचा महिमा आगाध आहे. दत्तगुरुंची भक्तीरुपी सेवा महत्त्वाची आहे. ती आपल्याकडून झाली पाहिजे, असे भक्तिमय उद्गार हभप दिनेश महाराज मते यांनी चिरनेर कातळपाडा येथील दत्तजयंती उत्सवात काढले.

गेल्या अनेक वर्षाची दत्त जयंती उत्सवाची परंपरा राखत, उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे दत्त जयंती उत्सव मोठ्या भक्ती भावाने साजरा करण्यात आला. या वेळी हभप दिनेश महाराज मते



हे आपल्या कीर्तन रुपी किर्तन सेवेतून बोलत होते. दरम्यान सकाळी अभिषेक, महापूजा करण्यात आली. त्यानंतर भजनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले.

नातिवली येथील वेदांत भक्ती गोशाळेचे कीर्तनकार ह भ प दिनेश महाराज मते यांचे श्री दत्तगुरूंच्या जन्मोत्सवाचे कीर्तन झाले. या वेळी गायिका सुजाता गोंधळी यांनी दत्त जन्मोत्सवाचे पाळणा गीत सादर केले. त्यानंतर दत्तगुरूंची महाआरती घेण्यात आली आणि भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. उरण तालुक्यातील भाविकांनी दत्तगुरूंच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चिरनेर कातळपाडा ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.

## लोकनेते रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेजमध्ये आरोग्य शिबिर



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

आरोग्य धनसंपदा ही उक्ती लक्षात घेऊन लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनि. कॉलेज, कामोठे येथे सर्व शिक्षकांसाठी सोमवारी (दि.१६) आरोग्य शिबिराचे आयोजन केले गेले होते.

या शिबिरामध्ये उंची, वजन, हिमोग्लोबिन पातळी, रक्तातील साखर, ब्लडप्रेशर नेत्र चिकित्सा, इ.सी.जी दंतचिकित्सा तसेच वैद्यकीय सल्ला या गोष्टींचा अंतर्भाव होता. ज्याचा लाभ सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी घेतला. मेडीकव्हर हॉस्पिटल आणि युमानो हेल्थ केअर सेंटर लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनि. कॉलेज कामोठे व लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यामानाने सदर वैद्यकीय शिबिराचे आयोजन केलेले होते.

विविध उपक्रमांना नेहमीच प्राधान्यक्रम देणाऱ्या विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली संजय म्हात्रे यांनी हा उपक्रम राबवला. या शिबिरामधील मान्यवर डॉक्टरांचे प्राचार्यांनी आभार व्यक्त केले. ज्यामध्ये यूरोलॉजिस्ट डॉक्टर पियुष सिंघानिया, जनरल फिजिशियन डॉक्टर इशिका गुप्ता, कॅम्पचे आयोजक डॉ. रमेश यादव तसेच संकेत झा मॅनेजर, रामदयाल, बिझनेस एक्झिक्यूटिव्ह प्रियंका आदी होते.

याचा सर्वांनी लाभ घेतला. या उपक्रमाचे कौतुक होत आहे. यासाठी विद्यालयाच्या पर्यवेक्षिका शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सर्वच सहभागी होते.



## जीवनयात्रा संपवणाऱ्या व्यक्तीचे पोलिसांनी वाचविले प्राण

**कळंबोली : बातमीदार**

घरातील झालेल्या घरगुती भांडणाच्या कारणातून मानसिक संतुलन बिघडलेला व्यक्ती मुंबई पुणे महामार्गावर जाऊन गाडीखाली झोपून जीव देण्याच्या मनस्थितीत होता. रस्त्याच्या मधोमध उभा असलेल्या व्यक्तीची घालमेल ही वाहतूक शाखेवर कार्य तत्पर असलेल्या पोलिसांच्या नजरेस येताच, त्यांनी त्वरित घटनास्थळी धाव घेऊन गाडीखाली झोकुन जीव देणाऱ्या इसमाचे वैचारिक परिवर्तन करून जीवन संपवण्या पासूनपरावृत्त करण्यात यश मिळवले आहे. वाहतूक शाखेतील पोलीस निरीक्षक संजीव शिंदे व पोलीस हवालदार संजय



गावडे यांनी याबाबत महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कळंबोलीत राहणारे चंद्रकांत निवृत्ती यादव (वय५१) यांचे घरातील मुलाशी व पत्नीशी झालेल्या भांडणातून मानसिक संतुलन बिघडले होते. सोमवारी सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास त्यांनी तडक मुंबई पुणे महामार्ग गाठून ते रस्त्याच्या मधोमध उभे राहिले. रस्त्याच्या मधोमध उभे राहून मुंबईकडून पुण्याकडे जाणाऱ्या अवजड वाहनाच्या खाली आपले शरीर झोकून देऊन जीव देण्याच्या मनस्थितीत होते. तसा ते प्रयत्नही करत होते. ही गंभीर बाब ही वाहतूक शाखेमधील पोलीस निरीक्षक संजय शिंदे व पोलीस हवालदार संजय गावडे, प्रफुल पोकळे, सुरेश झिंजे यांच्या निदर्शनास आली. त्यांनी त्वरित चंद्रकांत यादव ज्या ठिकाणी उभे होते त्या ठिकाणी जाऊन त्यांना ताब्यात घेतले व त्यांना रस्त्याच्या बाजूस आणून त्यांची संपूर्ण विचारपूस केली तसेच घरातील कुटुंबियांचा फोन नंबर घेऊन त्यांच्याशी संपर्क करून दिला.

या वेळी चंद्रकांत यादव यांच्याकडे विचारणा केली असता मला जगायचे नाहीये, मला मरायचे आहे, मला जीव द्यायचा आहे, मला सोडा असे विनवणी करून सांगत होते, मात्र वाहतूक शाखेच्या पोलिसांनी बजावलेल्या उल्लेखनीय व मोलाच्या कामगिरी सतर्कतेमुळे एका कुटुंबातील व्यक्तीचे जीवन संपवण्यापासून वाचवू शकले. यानंतर पोलिसांनी सदरची बाब ही वरिष्ठांकडे चंद्रकांत निदर्शनास आणून दिली.

यादव यांच्या पत्नी पुष्पा यादव, मुलगा प्रणय यादव यांना बोलावून व त्यांची वैचारिक परिवर्तन करून त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. ही गंभीर बाब माहिती नियंत्रण कक्ष येथील एपीआय कणसे यांना ही कळविण्यात आली. वाहतूक शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांच्या या बहुमोल व उल्लेखनीय कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## संपादकीय

# सांस्कृतिक राजदूत

झाकीर हुसेन हे निव्वळ उत्तुंग प्रतिभेचे तबला वादक नव्हते. अलौकिक प्रतिभेची कला सादर करतानाच ते देश, संस्कृती यांच्या सीमा पार करत जगभरातील संगीतप्रकारांना एकत्र आणणारे सांस्कृतिक राजदूत बनले. आपल्या संगीत परंपरेचा आदर कायम राखत, तिला उच्च कोटीची प्रतिष्ठा मिळवून देतानाच त्यांनी विदेशी संगीतप्रकारांशी या परंपरेचा संगम घडवून आणला. झाकीर हुसेन यांच्या निधनाने जागतिक सांगितिक दुनियेने अनेकांना जोडणारा हा दुवा गमावला आहे.

**आपला जन्म माहीमच्या एका चाळीतील छोट्याशा घरात झाला हे विनासंकोच नमूद करणाऱ्या झाकीर हुसेन यांनी, या चाळीतील संस्कारांतून जी नीतीमूल्ये मनावर कोरली गेली, ती आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कलाकार झाल्यावरही अखेरपर्यंत जपली. 'आपण कुणी थोर कलावंत आहोत असे एकदा का तुम्ही मनाशी धरले की तुम्ही इतरांपासून स्वत:ला तोडता. तुम्ही त्या समुहाचा एक भागच बनून राहिले पाहिजे, त्यावर वर्चस्व न गाजवता' असे उद्गार झाकीरभाईंनी अलिकडेच एका मुलाखतीत काढले होते. आयुष्यभर ते हा दृष्टिकोन जपत वावरताना दिसले. असंख्य लहानमोठ्या कलाकारांच्या साथीसोबतीने आपली प्रतिभाशाली कला सादर करत राहिले, नवीन संकल्पना साकारण्यासाठी प्रयत्नशील राहिले. एकीकडे विद्यार्थ्याच्या भूमिकेत राहून कुतुहल जपत नित्य नवीन काही शिकत राहायचे आणि त्याचवेळेस जगभरातील असंख्य तरुण संगीतकारांच्या मार्गदर्शकाची भूमिकाही निभवायची हा समतोल त्यांनी साधला. कदाचित खूपच लहान वयापासून त्यांनी बड्या कलाकारांची साथसंगत केली असल्यामुळे की काय त्यांना हा आगळा सूर सापडला असावा. पंजाब घराण्याचे नामवंत कलाकार, तबलावादक अल्लारखा कुरेशी यांचे झाकीर हुसेन हे ज्येष्ठ सुपुत्र होते. अब्बाजींच्या स्वभावातली मिठास झाकीरभाईंमध्येही पुरेपूर उतरली. अब्बाजींमुळेच वयाच्या सातव्या वर्षापासून पंडित रवी शंकर, शिवकुमार शर्मा यांच्यासारख्या बड्या कलाकारांची साथसंगत करत झाकीर हुसेन यांची कारकीर्द सुरू झाली, पण परंपरेचा मान राखतानाच नव्याचा ध्यास हे त्यांचे वेगळेपण ठरले. १९७३ मध्ये गिटारवादक जॉन मॅकलॉघ्लिनसोबत त्यांनी 'शक्ती' या सांगितिक समुहाची स्थापना केली. भारतीय शास्त्रीय संगीताचा जॅझ व अन्य पाश्चिमात्य सांगितिक परंपरांशी मिलाप घडवून आणण्याची ती नांदी होती. पुढची पाच दशके 'शक्ती'मार्फत अनेक प्रतिभावान भारतीय कलाकार आंतरराष्ट्रीय मंचावर आले. 'शक्ती'च्या रचनांना आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वोच्च सांगितिक पुरस्कार मानल्या जाणाऱ्या ग्रॅमी पुरस्कारांनीही गौरविले. पण अर्थात जागतिक सांगितिक दुनियेतील झाकीर हुसेन यांचे योगदान त्याहीपेक्षा किती तरी पुढे जाणारे ठरले. आंतरराष्ट्रीय स्तरावर कमावलेला नावलौकिक त्यांच्या भारताशी असलेल्या नात्याच्या आड कधी आला नाही. ते सातत्याने भारतात येऊन येथील नव्याजुन्या कलाकारांसोबतही आपली कला सादर करत राहिले. शास्त्रीय संगीताशी फारशी तोंडओळख नसलेल्या सर्वसामान्य भारतीयांसाठीही तबला म्हणजे झाकीर हुसेन हे ज्ञात समीकरण होते. आपल्या कपाळावर, मानेवर झुलणाऱ्या केसांच्या बटांना तबल्याच्या तालावर नर्तन करायला भाग पाडणारी झाकीरभाईंची मनमोहक छबी सामान्यातल्या सामान्य भारतीयाला परिचित होती म्हणूनच चहाच्या जाहिरातीतून 'वाह ताज कहिए' म्हणणारे झाकीरभाईही टीव्हीच्या पडद्यावर झळकले. देश-संस्कृतीच्या सरहद्दी असोत वा वयाने येणारा लहानमोठेपणा अशा सगळ्या सीमारेषा पुसून टाकत सगळ्यांशी जोडला जाणारा हा अलौकिक कलाकार आता पुढल्या प्रवासाला निघून गेला आहे, परंतु त्यांच्या स्मृती जागतिक संगीतविश्वाला भविष्यातही अनेक वर्षे प्रेरित करीत राहतील.**

# महाड शहरामध्ये वाहतुकीचे नियोजन करणे गरजेचे

**खबरबात**
**महेश शिंदे**



ऐतिहासिक महाड शहरात उभ्या राहिलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकासमोर व्यावसायिक परवानगी देताना पालिकेने नियम दाबावर बसवले आहेत तर पोलीस प्रशासनदेखील जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने या ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे शिवाय राष्ट्रीय स्मारकाची सुरक्षादेखील धोक्यात आली आहे. याबाबतीत जिल्हाधिकारी कार्यालयाने लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.


महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडमध्ये सामाजिक समतेची बीजे रोवली. यामुळे महाडचे नाव जागतिक पटलावर नोंदवले गेले, मात्र या ऐतिहासिक शहरामध्ये वाहतुकीचे आणि शहर नियोजनाचे तीन तेरा वाजले आहेत. शहरातील सर्वच भागात बेशिस्तपणे वाहने पार्किंग केली जात असल्याने मोठ्या प्रमाणामध्ये वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. ही समस्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. शहरामध्ये महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने उभ्या राहिलेल्या राष्ट्रीय स्मारकासमोर इमारत परवानगी देताना नियम धाब्यावर बसवून महाड नगरपालिकेने परवानगी दिली आहे. याबाबतीत वारंवार तक्रारी होऊनदेखील कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या ठिकाणी आपला बाजार आणि आरसी का इलेक्ट्रॉनिक्स या दोन व्यावसायिक दुकाने सुरू झाली आहेत. यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर रस्त्यावरच वाहने पार्किंग केली जात आहे. ग्राहक आपले वाहन रस्त्यावर पार्किंग करून तासनतास खरेदी करतात. शिवाय राष्ट्रीय स्मारकाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळच विनापरवानगी रिक्षा उभ्या केल्याजात आहे. यामुळे धोतर्फा वाहन पार्किंग होऊन ये जा करणाऱ्या वाहनांना त्रास होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकामध्ये वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या ठिकाणी २० मार्च रोजी लाखो भीमसैनिक भेट देत असतात शिवाय शासकीय कार्यक्रम तसेच निवडणुकांचे कार्यक्रमदेखील याच ठिकाणी होत असतात. यामुळे राष्ट्रीय स्मारकासमोर कायम वाहनांची गर्दी असते. आता याच स्मारकासमोर व्यावसायिक इमारतीला परवानगी देत असताना केवळ रहिवासी पार्किंगचा नियम लावून इमारतीला पार्किंग देण्यात आली आहे, मात्र या ठिकाणी आपला बाजार आणि आरसीका इलेक्ट्रॉनिक्स असे दोन मोठे व्यवसाय सुरू असल्याने या ठिकाणी येणारे ग्राहक आपल्या वाहनांची पार्किंग रस्त्यावरच करून जातात. त्यातच आपला बाजारमध्ये ग्राहकांना घेऊन येणारे रिक्षा चालक स्मारकाच्या मुख्य द्वारासमोरच पार्किंग करून बसून राहतात. यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. याबाबत नगरपालिका आणि पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

आपला बाजार यापूर्वी छत्रपती शिवाजी मार्गावर कार्यरत होता त्या ठिकाणीदेखील अशाच प्रकारे वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत होते त्या ठिकाणीदेखील पोलीस प्रशासन कोणत्या प्रकारची कारवाई करत नव्हते यामुळे पालिका प्रशासन आणि पोलीस प्रशासन या व्यवसायांना पाठबळ देऊन वाहतूक कोंडीला समर्थन करते का असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहर नियोजनामध्ये पालिका प्रशासनाकडून काटेकोर अंमलबजावणी होत नसल्याने याबाबतीमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशा प्रकारची मागणी देखील नागरिकांकडून केली जात आहे.

या ठिकाणी होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबत सदर इमारती ला आणि त्या ठिकाणी असलेल्या दुकानांना नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत. याबाबत उपाययोजना न झाल्यास कारवाई केली जाईल, असे आश्वासन अनेक वेळा पालिका प्रशासनाकडून दिला जात आहे, मात्र महाडच्या वाहतूक कोंडीसाठी एखादा एक्शन प्लॅन होण गरजेच आहे.

# चित्रकार व लेखक डी.डी. रेगे



विलक्षण बोलक्या आणि जिवंत व्यक्तिचित्रणाच्या अत्यंत दुर्मिळ हातोटीमुळे अनेक नामवंतांकडून सन्मानित झालेले जुन्या जमान्यातील प्रख्यात चित्रकार व लेखक, डी डी रेगे यांचा जन्मदिन. त्यांचा जन्म १७ डिसेंबर १९११ रत्नागिरी जिल्ह्यातील 'पाचल' येथे.

दत्तात्रय धोंडो रेगे उर्फ डी. डी. रेगे यांचे बालपण कोकणातल्या निसर्गसमृद्ध 'पाचल' येथे गेले. याच परिसराने डी. डी. रेगे यांच्यातील कलाकाराला जागृत केले, कलाविष्काराकडे पाहण्याची रसिक नजर बहाल केली. पुढे काही कारणाने, सातारा येथे स्थलांतरित झाल्यावर न्यू इंग्लिश स्कूल, सातारा आणि तात्कालिक सरकारी हायस्कुलात दाखल झालेल्या डी. डी. रेगे यांना शालेय शिक्षणासोबत चित्रकलेचा लळा लागला. ते दिवस होते ब्रिटिश विरोधी आंदोलनाचे. नकळतच डी. डी. रेगे यांच्या मनाच्या तळाशी देशप्रेमाचे, स्वातंत्र्यप्राप्तीचे विचार अगदी खोलवर झिरपले होते, त्यात भरीसभर म्हणून रत्नागिरीमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांचा प्रदीर्घ सहवास त्यांना लाभला. साहजिकच डी. डी. रेगे यांच्या मनात क्रांतीची बीजं रोवली गेली. त्या ऊर्मीतच डी. डी. रेगे यांनी सैन्यदलात भरती होण्याचा निर्णय घेतला. एकीकडे कर्तव्य तर दुसरीकडे चित्रकलेची ओढ. मात्र मनाने कर्तव्याला श्रेष्ठ मानले आणि रेगे यांचा प्रवास युद्धभूमीकडे झाला.

यथावकाश युद्धभूमीवरून परतल्यावर डी. डी. रेगे यांनी आपल्या मूळ छंदाकडे अर्थात चित्रकलेकडे आपला मोर्चा वळवला. अल्पावधीतच चित्रकार डी. डी. रेगे म्हणून ते देशाविदेशात ख्यातकीर्त झाले. पहिली पत्नी सौ. यशवंती व द्वितीय पत्नी सौ. मालती यांच्यासोबत संसारसुखाची मार्गक्रमणा करणार्या. डी. डी. रेगे यांचे प्रापंचिक आयुष्य समृद्ध झाले ते कन्येच्या, चि. शिवदुर्गा हिच्या आगमनाने. नामांकित चित्रकार, छांदिष्ट अवलिया, तपस्वी संग्राहक म्हणून भरभरून यश मिळविणाऱ्या डी. डी. रेगे यांचा कौटुंबिक प्रवासही समृद्ध व संपन्न झाला.

आघाडीचे चित्रकार म्हणून नावलौकिक संपादन करीत असतानाच डी. डी. रेगे यांनी कुंचल्यासोबत लेखणीचे आव्हान देखील स्वीकारले. १९३९ ते १९४५ या दरम्यान झालेल्या दुसर्यास महायुद्धात भाग घेणाऱ्या चित्रकार डी. डी. रेगे यांच्या हाती राष्ट्रकवी रविंद्रनाथ टागोर यांच्या नोबेल पारितोषिक विजेत्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहाची प्रत आली. विलक्षण झपाटल्यागत त्यांनी ती वाचून काढली. इतकंच नव्हे तर अधूनमधून मिळणारा वेळ त्यांनी 'गीतांजली'च्या काव्यवाचनात सत्कारणी लावला. लहानपणापासून समर्थ श्रीरामदासांबद्दल अतीव प्रेम व आदर असल्याने चित्रकार डी. डी. रेगे यांच्या मनात आपणांसी जे जे ठावे ते इतरांसीही सांगावे' अशी इच्छा दाटून आली आणि धुमश्र्चक्रीने व्यापलेल्या त्या समरांगणावर 'गीतांजली' या काव्याचा मराठी भावानुवाद त्यांच्या हातून साकारला गेला. या अनुवादाचे खुद्द रविंद्रनाथ टागोरांपासून महात्मा गांधींपर्यंत अनेक दिग्गजांनी अतिशय कौतुक केले.

गीतांजलीच्या भावोत्कट अनुवादानंतर चित्रकार डी. डी. रेगे यांच्या हातून कलावंतांची शब्दचित्रे, श्रीसद्गुरु नारायण महाराज (चरित्र), क्रिकेटवीरांच्या तीन पिढ्या, संतश्रेष्ठ गोविंद (चरित्र), पुणे व प्राचीन धार्मिकस्थाने, श्रीगोविंदविजय (पोथी), श्रीजंगली महाराज (संशोधन), संतप्रसाद भाग १ व २ तसेच चित्रे नियतीची (आत्मवृत्त) अशी लेखनसंपदा लिहून झाली. त्यासोबतच दै. सकाळ आणि दै. स्वराज्य यांसारख्या पुण्यातील प्रतिष्ठित वर्तमानपत्रातून त्यांनी केलेल्या लेखनानेही एक काळ गाजविला.


आर्थिक कुचंबणा, ओढगस्तीचा संसार यातून मार्ग काढीत डी. डी. रेगे यांनी त्यांचा छंद निव्वळ जोपासलाच नाही तर वृद्धिंगत देखील केला. त्यांचा हा उपक्रम, आजही 'संतवैभवाची साक्ष' देत ठामपणे उभा आहे. डी. डी. रेगे यांचे २ सप्टेंबर १९९९ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**




# व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप कॉलमध्ये कॉन्टॅक्ट सिलेक्ट करणे शक्य

तुम्ही व्हॉट्सअ‍ॅप युजर्स असाल तर ही बातमी खास तुमच्यासाठीच आहे. आता व्हॉट्सअ‍ॅपचे एक नवे फीचर आले आहे. यामुळे तुम्हाला व्हॉट्सअ‍ॅप कॉलिंगमध्ये काही खास मिळणार आहे. तुम्ही म्हणाल नेमकं यात काय अपडेट आहे. तर आम्ही व्हॉट्सअ‍ॅपच्या नव्या फीचरविषयी विस्ताराने माहिती सांगणार आहोत. त्यातील एक महत्त्वाचा भाग सांगायचा म्हणजे डेस्कटॉपवर कॉलिंग करणे आता सोपे होणार आहे, याविषयी खाली जाणून घेऊया.




आता व्हॉट्सअ‍ॅप युजर्स व्हिडिओ कॉलिंगदरम्यान स्नॅपचॅटसारख्या लोकप्रिय इन्स्टंट मेसेजिंग अ‍ॅपचा वापर करू शकणार आहेत. होय, मेटाने व्हिडिओ कॉल मजेदार करण्यासाठी हे फीचर रोलआउट केले आहे. युजर्स सहजपणे प्रभाव वापरू शकतात.

### कॉलिंगसाठी व्हॉट्सअ‍ॅपचे नवे फिचर

व्हॉट्सअ‍ॅपने कॉलिंगसाठी एक-दोन नव्हे तर अनेक नवे फीचर्स आणले आहेत. ते अँड्रॉईड आणि आयओएस दोन्ही युजर्ससाठी आणले गेले आहेत.

### ग्रुप कॉलमध्ये कॉन्टॅक्ट्स सिलेक्ट करू शकाल

व्हॉट्सअ‍ॅपच्या ब्लॉग पोस्टनुसार, आता जर तुम्हाला ग्रुप कॉलमध्ये ग्रुपमधील सर्व सदस्यांना कॉल करायचा नसेल तर तुम्ही ग्रुपमधील काही सदस्यांची निवड करू शकता. आता ग्रुप चॅटमधून कॉल सुरू केल्यावर तुम्ही विशिष्ट सदस्यांची निवड करू शकता. यामुळे बाकीच्या लोकांना त्रास न देता तुम्हाला हव्या त्या व्यक्तीला फोन करता येईल.

स्नॅपचॅटप्रमाणेच व्हिडिओ कॉलसाठी व्हॉट्सअ‍ॅपवर युजर्सला दहा इफेक्ट्स मिळत आहेत. यात पिल्लाचे कान लावणे, आपल्याला पाण्याखाली नेणे किंवा कराओकेसाठी मायक्रोफोन देणे इत्यादींचा समावेश आहे.

आता व्हॉट्सअ‍ॅपडेस्कटॉप अ‍ॅपवरील कॉल टॅबवर क्लिक केल्यावर कॉल सुरू करणे, कॉल लिंक तयार करणे किंवा थेट नंबर डायल करण्याचे अनेक पर्याय मिळतात.

डेस्कटॉप असो किंवा मोबाईल फोन, आता तुम्हाला चांगल्या दर्जाची कॉलिंग गुणवत्ता मिळणार आहे. आपण सिंगल कॉल आणि ग्रुप कॉल दोन्हीवर स्पष्ट चित्रांसह हाय-रिझोल्यूशन व्हिडिओचा आनंद घेऊ शकता.

व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप कॉलमध्ये कॉन्टॅक्ट सिलेक्ट करणं शक्य असल्यानं तुम्हाला वाटेल त्याच लोकांना ग्रुप कॉलिंगदरम्यान सिलेक्ट करू शकता तसेच स्नॅपचॅटसारखे इफेक्ट्सही वापरू शकता.

# वसई किल्ला मोहिमेचे शिलेदार चिमाजी अप्पा



**निमित्त**

महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी पोर्तुगीज वर्चस्वातून मुक्त करण्यासाठी यशस्वी मोहीम राबवणारे चिमाजी अप्पा यांचा १७ डिसेंबर स्मृतिदिन. दोन वर्ष झुंज देऊन त्यांनी वसईचा किल्ला जिंकला. साष्टी बेटांवर त्यांनी मराठ्यांची सत्ता स्थापन केली. पेशवा बाळाजी विश्वनाथ भट यांचे पुत्र व बाजीराव पेशव्यांचे धाकटे भाऊ म्हणजे चिमाजी अप्पा. सदाशिवराव भाऊ हे त्यांचे पुत्र होते. वसईच्या लढाईला ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे मानण्यात येते. महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी पोर्तुगिजांच्या तावडीतून सोडवण्याच्या महत्त्वपूर्ण मोहिमेसाठी चिमाजी अप्पा यांची नेमणूक करण्यात आली. ही लढाई जिंकत चिमाजींनी थोरले बंधू बाजीराव पेशवे यांचा विश्वास सार्थ ठरवला.

महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी पोर्तुगीज वर्चस्वातून मुक्त करण्यासाठी यशस्वी मोहीम राबवणारे चिमाजी अप्पा यांचा १७ डिसेंबर स्मृतिदिन. २ वर्ष झुंज देऊन त्यांनी वसईचा किल्ला जिंकला. साष्टी बेटांवर त्यांनी मराठ्यांची सत्ता स्थापन केली. पेशवा बाळाजी विश्वनाथ भट यांचे पुत्र व बाजीराव पेशव्यांचे धाकटे भाऊ म्हणजे चिमाजी अप्पा. सदाशिवराव भाऊ हे त्यांचे पुत्र होते. वसईच्या लढाईला ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे मानण्यात येते. महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी पोर्तुगिजांच्या तावडीतून सोडवण्याच्या महत्त्वपूर्ण मोहिमेसाठी चिमाजी अप्पा यांची नेमणूक करण्यात आली. ही लढाई जिंकत चिमाजींनी थोरले बंधू बाजीराव पेशवे यांचा विश्वास सार्थ ठरवला. वसईची लढाई जिंकून त्यांनी पोर्तुगीजांचे त्या परिसरातील वर्चस्व नष्ट केले. या मोहिमेत नाट्यमय आणि तेवढ्याच विस्मयजनक घटना घडल्या. १७ फेब्रुवारी १७३९ रोजी मराठ्यांनी चिमाजी अप्पा यांच्या नेतृत्वाखाली खुद्द वसईवर चाल केली. पोर्तुगीजांनी आपली शिबंदी वसईच्या किल्ल्यात घेतली व वसईचा वेढा सुरू झाला.

मराठ्यांनी मोठ्या शिताफीने पूर्ण किल्ल्याभोवती घेरा घातला व किल्ल्याची पूर्ण नाकेबंदी करून टाकली. अत्यंत चिकाटीने चिमाजी अप्पा यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी वसईच्या किल्ल्याला वेढा घातल्यानंतर गनिमी काव्याच्या सहाय्याने त्यांनी किल्ल्यावर हल्ले चालूच ठेवले. या हल्ल्यातच पोर्तुगीजांचा सेनापती सिल्व्हेरा दि मेंझेस मारला गेला. सेनापतीच्या मृत्युपश्चातदेखील पोर्तुगीजांनी लढा सुरूच ठेवला. हातबॉम्ब, बंदुका, उखळी तोफा यांच्या सहाय्याने त्यांनी मराठ्यांचा प्रतिकार चालूच ठेवला. तंत्रज्ञान, अस्त्रे आणि शस्त्रांनी पोर्तुगीजांनी मराठ्यांचे खूप नुकसान केले, मात्र तरीही मराठ्यांनी आपला वेढा सैल केला नाही. आंग्र्यांच्या आरमाराने समुद्री मार्ग बंद केले होते. तेथूनही रसद मिळणे बंद झाले. त्यानंतर शेवटी १६ मे १७३९ रोजी मराठ्यांनी वसईच्या किल्ल्यावर एल्गार केला. यावेळी चिमाजी अप्पांनी स्वतः पहिली तोफ डागली. त्यानंतर नारो शंकर दाणी यांच्या नेतृत्वाखालील घोडदळ आणि आंग्र्यांचे आरमार यांनी दोन्ही बाजूंनी पोर्तुगीजांवर हल्ला केला.

तोफखान्याचे सरदार गिरमाजी कानिटकर आणि मानाजी आंग्रे यांच्या बरकंदाजांनी बुरुजावरील पोर्तुगीज शिपायांना लक्ष्य केले. चहूबाजूंनी होणार्या मराठ्यांच्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यास अपयश येत असल्याचे पाहून पोर्तुगीजांनी अखेर बचावासाठी शरणागती पत्करली. यावेळी शरण आलेल्या पोर्तुगीजांनी त्यांच्या सैन्याला मानाने वाट काढून देण्याची विनंती केली. चिमाजींनी मोठ्या मनाने पोर्तुगीजांची विनंती मान्य केली. वसई किल्ल्याच्या यशस्वी मोहिमेनंतर चिमाजी आप्पा स्थानिक जनतेत लोकप्रिय झाले.

मराठ्यांच्या राजकारणाला उत्तराभिमुख बनवून मराठा साम्राज्यविस्ताराला चालना देण्यात बाजीराव पेशव्यांचे योगदान महत्त्वपूर्ण होते आणि चिमाजींचे सारे जीवितकार्य त्याला पूरक होते. पेशवा बनणार नाही हे माहीत असूनही ते पेशवाईशी कायमच प्रामाणिक, एकनिष्ठ राहिले. १७ डिसेंबर १७४० रोजी चिमाजी अप्पा यांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : ग्रामीण भागातील महिला जंगलातून सुकी लाकडे सरपणासाठी आणतात. त्यांचे सुधीर नाझरे यांनी टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# फळे, भाज्यांचे सलाड कसे व किती खावे?

फळ आणि भाज्यांचे सलाड खाणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. ते खाल्ल्याने शरीराला जीवनसत्त्वे, खनिजे आणि फायबरसारखे आवश्यक पोषक घटक मिळत असतात, पण तज्ञांच्या म्हणण्यानुसार फळे आणि भाज्यांचे सलाड एकत्र खाण्यापूर्वी काही गोष्टीची काळजी घेणे आवश्यक आहे.



रोजच्या जेवणामध्ये भाज्या आणि फळांचा समावेश करण्याचा सल्ला अनेकदा आहार तज्ञ देतात. फळे आणि भाज्या योग्य प्रमाणात खाल्ल्याने त्याचे शरीराला अनेक फायदे होतात. ज्यांना भाज्या आवडत नाही त्यांच्यासाठी सलाड हा एक उत्तम पर्याय आहे. सलाड खाणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. काहींना फ्रुट सलाड आवडते तर अनेकांना भाज्यांचे सलाड आवडते, पण काहीजण फळ आणि भाज्यांचे सलाड एकत्र खातात. या दोन्ही गोष्टींमध्ये मोठ्या प्रमाणात जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर, पोटॅशियम, जस्त आणि लोहा सह अनेक पोषक घटक आढळतात. दिल्ली येथील आहारतज्ञ प्रिया पालीवाल यांच्या म्हणण्यानुसार फळे आणि भाज्यांचे सलाड एकत्र खाने हा एक आरोग्यदायी पर्याय आहे. फळे आणि भाज्यांचे सलाड एकत्र खाल्ले तर यामुळे जास्त जीवनसत्वे, खनिजे आणि फायबर मिळतातच, शिवाय त्यासोबतच त्यामध्ये कॅलरीजही कमी असतात. फळे आणि भाज्या दोन्ही आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे, पण त्या खाण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. भाज्या आणि फळांचे सलाड एकत्र खाल्याने आरोग्यावर काय परिणाम होतात ते तज्ञांकडून जाणून घेऊ.

डॉक्टर पालीवाल सांगतात की, जर तुम्ही भाज्या आणि फळांचा एकत्रित सलाड खात असाल तर तुम्ही सफरचंद, गाजर आणि शलगम एकत्रित खाऊ शकतात. यामध्ये तुम्हाला भरपूर फायबर आणि व्हिटॅमिन ए मिळेल. ज्यांना मधुमेह आणि किडनीचा आजार आहे त्या रुग्णांसाठी हे अतिशय फायदेशीर ठरेल. फळे आणि भाज्यांचे सलाड बनवण्यापूर्वी ते एकदा स्वच्छ धुऊन घ्या.

तज्ञांच्या म्हणण्यानुसार भाज्या आणि फळे एकत्रित खाण्यापूर्वी काळजी घेणे आवश्यक आहे. काही वेळा त्या आरोग्यास हानी पोहचू शकतात. काही भाज्या आणि फळांमध्ये असे घटक असतात, जे पचनाशी संबंधित समस्या निर्माण करू शकतात. एवढेच नाही तर काही फळे आणि भाज्या एकत्रित सलाडच्या रूपात खाल्ल्याने अ‍ॅलर्जी होऊ शकते. त्यामुळे ते योग्य प्रमाणातच खाण्याचा सल्ला तज्ञांनी दिला आहे.

# कर्जतमध्ये पाच दुकाने फोडली

## सामानाची चोरी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात एकाच रात्री पाच दुकाने फोडल्याने खळबळ उडाली आहे. शहरात याआधीही अशा प्रकारच्या चोरीच्या घटना घडल्या असून चोरट्यांची कार्यपद्धती ही बंद दुकाने निवडून शटर तोडण्याची आहे.

थंडीच्या हंगामाचा फायदा घेत चोरट्यांनी पहाटे ३च्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज स्मारक डेक्कन जिमखाना परिसरातील गायकर यांचे हॉटेल समर्थ कृपा, निर्मल पान शॉप, दीपक एंटरप्रायजेस नावाचे कोल्ड्रिंक्सचे होलसेल दुकान, क्रिएटिव्ह




फोटो स्टुडिओ आणि किराणा दुकानाचे शटर वाकऊन चोरी केली. यामध्ये मोठी रोख रक्कम चोरट्यांच्या हाताला लागली नसली तरी फोटो स्टुडिओमधील महागडा कॅमेरा व मेमरी चीप चोरीली गेली आहे. कोल्ड्रिंक्स दुकानातून चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे डीव्हीआरसुद्धा काढून नेले आहे.

पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी सुरू केली असून चोरांचा शोध घेण्यासाठी गस्त वाढवण्यात आली आहे तसेच विशेष पथक तयार करण्यात आले आहे. व्यापाऱ्यांनीही रात्री दुकाने व्यवस्थित बंद करून सीसीटीव्ही लावावेत. कोणत्याही संशयास्पद हालचाली दिसल्यास तातडीने आम्हाला कळवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र मोहिमेचा जिल्ह्यात शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र या मोहिमेचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांच्या हस्ते सोमवारी (दि.१६) अलिबाग तालुक्यातील वरसोली येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आला. सदर मोहीम १६ डिसेंबर ते २० डिसेंबर दरम्यान राबविण्यात येणारं असून, या मोहिमेतंर्गत वीटभट्टी, खाणकामगार, स्थलांतरित व्यक्ती, कारागृहातील कैदी, वृध्दाथम, अनाथाश्रम, वसतिगृहातील विद्यार्थी इत्यादींची तपासणी केली जाणार आहे.



कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र मोहिमेतंर्गत नियमित सर्वेक्षणामध्ये कुष्ठरोगाच्या तपासणीपासून वंचित राहिलेल्या घटकांचे सर्वेक्षण, जनजागृती करुन, नवीन कुष्ठरुग्ण शोधून, मोफत बहुविध औषधोपचारांद्वारे संसर्गाची साखळी खंडीत करणे, हा उद्देश ठेवण्यात आला आहे. जिल्हाभरात ३७ हजार ५६८ इतक्या लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये वीटभट्टी, खाणकामगार, स्थलांतरित व्यक्ती, कारागृहातील कैदी, वृध्दाथम, अनाथाश्रम, वसतिगृहातील विद्यार्थी इत्यादींची तपासणी केली जाईल.

जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली हि मोहिम राबविण्यात येणार आहे. सदर मोहिमेचा शुभारंभ वरसोली येथे करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे, डॉ. प्राची नेहूलकर, डॉ. सचिन संकपाळ, डॉ. अश्विनी सकपाळ उपस्थित होते.

# वढाव येथील दत्तगुरू जन्मोत्सवाची सांगता

## आमदार रविशेठ पाटील यांचा ग्रामस्थांकडून सत्कार

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वढाव येथील दत्तगुरूंच्या नवीन मूर्तीचा जीर्णोद्धार १२ ते १४ डिसेंबरपर्यंत तीन दिवस पार पडला. मूर्ती ओढांगी येथून टाळ मृदुंगाच्या गजरात भजन गात आणण्यात आली. या वेळी आमदार रविशेठ पाटील यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

वढाव येथ दत्तमंदिर १९७८ साली बांधले गेले होते ४६ वर्षांनी या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. यासाठी गावातील समीर सुहास म्हात्रे यांचे मोलाचे सहकार्य



लाभले. सायंकाळी मंदिरासमोर सहा वाजता हरिपाठ कार्यक्रम झाला. शुक्रवार १३ डिसेंबरला गुरुचरित्रच्या अध्यायाचे तसेच ज्ञानेश्वरी वाचन झाले दुपारी १२ वाजता भजनाचा कार्यक्रम झाला सायंकाळी ४ वाजता सत्यनारायणाची महापूजा व महाप्रसाद झाला. संध्याकाळी ७ वाजता तुळजाभवानी संगीत भजन मंडळ वडगाव यांच्या भजनाचा कार्यक्रम झाला.

रात्रौ ९ वाजता हभप श्रेयस मंदार व्यास (डोंबिवली) यांचे कीर्तन झाले त्यांना तबला साथ संकेत पाटील (कळवे) व हार्मोनियम साथ निकिता थळे ९पेण ) यांची लाभली. १४ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता हभप श्रेयस मंदार व्यास (डोंबिवली) यांचे दत्त अवतार कार्यावर कीर्तन झाले

यावेळी उपस्थित पेणचे आमदार रविशेठ पाटील यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. रात्रौ ९ वाजता पेण-दिवा रेल्वे प्रवासी संघटनेचे नंदकुमार ठाकूर यांच्या संगीतभजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# तुपगाव येथे रक्तदान शिबिर

## रक्तदात्यांना आयोजकांकडून भेटवस्तू

**चौक : प्रतिनिधी**

दत्त जयंतीचे औचित्य साधून बिर्ला कार्बन कंपनीने स्वामी समर्थ मठ तुपगाव यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यास रक्तदाते यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बिर्ला कार्बन इंडिया प्रा.लिमिटेड युनिट पाताळगंगा यांच्या मदतीने आणि स्वामी समर्थ मठ तुपगाव चौक यांच्या सहकार्याने, एमजीएम हॉस्पिटल कामोठे, पनवेल यांच्या सौजन्याने दत्त जयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यास रक्तदाते यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रक्तदाते यांना बिर्ला कार्बन कंपनी



कडून व्हीआयपी बॅग आणि सर्टिफिकेट देण्यात आले.

या वेळी बिर्ला कार्बन कंपनीचे वरीष्ठ अधिकारी लक्ष्मण मोरे, स्वामी समर्थ मठाचे दिलीप साळुंखे यांचे विशेष सहकार्य लाभले. सर्वत्र दत्त जयंती धार्मिक कार्यक्रमांनी साजरी होत असताना तुपगाव येथे रक्तदान उपक्रम घेण्यात आला.

# रोह्यात शॉक लागून एकाचा मृत्यू

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील आंबेवाडी येथील गणेश नगर येथे रविवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास बाळाराम तेलंगे (वय ५३, रा. हेटवणे) यांचा विजेचा शॉक लागून मृत्यु झाल्याची घटना घडली.

कोलाड पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार आंबेवाडी येथील गणेश नगर येथे बाळाराम तेलंगे वेली काढण्यासाठी पोलवर चढले असते त्याला विजेचा शॉक लागल्याने ते खाली पडले. त्यांना उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी येथे आणले. येथील डॉक्टरांनी तपासले असता त्याला मयत घोषित केले. या प्रकरणी कोलाड पोलीस ठाण्यात त्यांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

# लोककला दर्शविणारा तमाशाचा फड चौल यात्रेतून गायब

## लावणी साज अन् ढोलकीचा ठेका अनुभवायला न मिळाल्याने रसिक प्रेक्षकांची नाराजी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

एकेकाळी तमाशा व लावणीचा फड चौल दत्तयात्रेच्या निमित्ताने रसिक प्रेक्षकांची खरी आवड होती. जत्रा म्हटली की, ढोलकीचा ताल, ढोलकीचा ठेका, लावणीचा ताल अस्सल मराठी ढोलकी व लावणीचा तोडा, मात्र चौलच्या श्री दत्त यात्रेतील तमाशा व लावणीचा फडाचा नाद हरवला असून तमाशा व लावणीच्या फडाच्या गैरहजेरीने रसिक प्रेक्षक नाराज झाला आहे.

महाराष्ट्रासह रायगड जिल्हात सुध्दा गावागावातील यात्रा आजही प्रसिध्द आहेत. या जत्रेंच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ठेवा असलेल्या तमाशा व लावणीची खर्या अर्थान जपवणूक झाली आहे. असंख्य रसिक प्रेक्षक या जत्रेच्या माध्यमातून लोककलेचा आनंद लुटूत असतात.

चौल भोवाळे पर्वतवासी श्री दत्त यात्रा संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिध्दीस आहे, प्रतिवर्षी पाच दिवस दत्त जयंती निमित्त या भव्य यात्रेचे



नियोजन पारंपारिक पध्दतीने होत असते. सर्वात मोठी व आर्थिक उलाढालीची यात्रा म्हणून चौल श्री दत्त यात्रेची ओळख आहे. कोरोना कालावधी सोडला तर प्रतिवर्षी चौल श्री दत्तयात्रेस रायगडसह महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून भाविक,पर्यटक व यात्रेकरू येथे येतात. महाराष्ट्रातील यात्रांच्या परंपरेची जपवणूक चौल श्री दत्त यात्रेंने खरा अर्थाने ठेवली गेली आहे.

सुगीचे दिवस संपल्यानंतर शेतकरीवर्गास यात्राचे वेध लागतात, पावसाळी व हिवाळी हंगाम आटोक्यात आल्याने शेतकरीवर्ग आर्थिकदृष्टा तेजीत असतो. ठिकठिकाणी गावागावातून भरत असलेल्या यात्रेला भाविकतेने शेतकरीवर्ग भेटी देत आनंद व्दिगणीत करतो. चौल भोवाळे येथे पर्वतवासी श्री दत्त जयंती उत्सवाचे निमित्ताने पारंपारीक पध्दतीने श्री दत्त यात्रा भरते, या यात्रेस परिसरातील शेतकरी बंधू निश्चित येतात. चौल यात्रेच्या निमित्ताने विविध वस्तूचे स्टॉल, मिठाई, आकाश पाळणे, आदी अनेक दुकाने थाटलेली असतात.

चौल श्री दत्त यात्रेत मुख्य आकर्षण होते ते तमाशा व लावणीचा फड, काही वर्षापुर्वी तमाशा व लावणी प्रेमी रसिक प्रेक्षकांच्या मागणी व आवडीने येथे तमाश्याचे दोन फड येत असत. सांस्कृतिक कार्यक्रमाचे निमित्ताने या तमाशा फडाला रसिक प्रेक्षकांची मोठी गर्दी होत असे. ढोलकीच्या ठेकावर व लावणीच्या तालावर येथील रसिक प्रेक्षक ठेका धरत असत. महाराष्ट्रातील अनेक प्रसिध्द तमाशा फडानी चौल यात्रेच्या निमित्ताने तमाशा व लावणी कलावंतानी लोककलेची अदाकारी येथे रसिक प्रेक्षकांना सादर केली आहे.

मात्र कुठे काय बिनसले, चौल श्री दत्त यात्रेतील तमाशा व लावणीचा फड हद्पार झाला. चौल यात्रेत प्रतिवर्षी येत असलेला तमाश्याचा फडाची उपस्थिती गेले काही वर्ष होत नाही. अनेकदा रसिक प्रेक्षकांनी यात्रेत तमाश्याचा फड पुनस्यः सुरू व्हावा म्हणून मागणी केली, प्रयत्न केले. परंतू काहीच्या गैर मागण्याने तमाश्या फडानी तोंड फिरविल्याचा आरोप स्थानिकस्तरावर केला जातोय. त्यामुळे आर्थिक उत्पन्नात होत असलेली घट, काहींच्या नाहक त्रासाने व सुरक्षीत भावना नसल्याने येथे तमाशा फड मंडळी येत नसल्याचे म्हटले जातेय.

येथील रसिक प्रेक्षक मात्र तमाशा व लावणीच्या लोककलेल्या आनंदास मुकला असून सर्व स्तरातून चौल यात्रेत तमाशा फड नसल्याने नाराजीचा सुर येत आहे. कोणीतरी पुढाकार घेवून पुनस्यः चौल श्री दत्त यात्रेतील तमाश्या व लावणीचा फड सुरू करावा, तसेच चौल श्री दत्त यात्रेतील ढोलकीचा ताल, ढोलकीचा ठेका, लावणीचा ताल पुन्हा घुमावा व लोककलेच्या परंपरेचा आस्वाद पुनस्य रसिक प्रेक्षकांना मिळावा अशी जोरदार मागणी होत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत आमचे अशील हे कायम खरेदीखत करून प्रस्ताविक मिळकतीचे मालक श्री. अर्जुन रतनसिंह राठोड या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कसळखंड तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| कसळखंड | ११३/१ | ७-७३-००<br>पो.ख. ०-७९-०० | १५.४६ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक १६/१२/२०२४

**सही/-**
**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**

पत्ता : C/o डी/३/१, किनारा हौ. सोसायटी, बावन बंगला पनवेल ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६ . मो.नं. ९८२०७९५६०५


# श्रीवर्धन किनाऱ्यावर रिडले कासवांचे संरक्षण

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

समुद्रकिनाऱ्यावर अति संरक्षित ऑलिव्ह रिडले कासवांचे संरक्षण आणि संवर्धन हे निसर्गप्रेमी व वन विभागाच्या माध्यमातून श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर, दिवेआगर आणि श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात सुरू आहे. ही समुद्री कासवांची प्रजाती, जी सध्या दुर्मिळ आणि संकटात आहे, तिचे संरक्षण करण्यासाठी विविध उपाययोजना केली जात आहेत.



ऑलिव्ह रिडले कासवांची मादी श्रीवर्धन दांडा, हरिहरेश्वर आणि दिवेआगर येथील समुद्रकिनाऱ्यावर वाळूत अंडी घालते. या कासवांचे प्रजनन मुख्यतः नोव्हेंबर ते मार्च या काळात होतो. मादी कासव एका वेळी शंभर ते दीडशे अंडी घालते, आणि ही प्रक्रिया रात्रीच्या वेळी, भरतीच्या वेळी होते. मादी कासव, समुद्राच्या पाण्यापासून सुमारे सत्तर ते ऐंशी मीटर अंतरावर, दिड ते दोन फूट खोल खड्डा खणून अंडी घालते आणि पुन्हा समुद्रात परत जाते.

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील वाढते पर्यटन आणि मानवी वर्दळ या कासवांच्या प्रजनन प्रक्रियेला अडचण ठरत आहेत. विशेषतः तीन किलोमीटर लांब समुद्रकिनाऱ्यावर होणारी वाहतूक आणि पर्यटकांच्या गाड्या यामुळे ओल्या वाळूत होणारी दबाबामुळे वाळू कठीण झाली आहे, ज्यामुळे कासवांना अंडी घालणे कठीण जात आहे.

ऑलिव्ह रिडले कासवांची शास्त्रीय नावे Lepidochelys olivacea आहे आणि त्याची वयोमर्यादा पन्नास वर्षे असते. हे हिरवट रंगाचे कासव उष्णकटिबंधीय किनाऱ्यावर आढळतात. त्यांचा आकार दोन ते अडीच फूट असतो. या कासवांचे संरक्षण आणि संवर्धन हे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण ते समुद्रातील जैवविविधतेचा एक अविभाज्य भाग आहेत

### अधिवास धोक्यात!

मादी कासव आपल्या प्रजननासाठी दीड फूटपर्यंत खड्डा करते. तिच्या रंगाच्या आधारावर 'ऑलिव्ह रिडले' कासवाचे नाव ठेवले गेले आहे. या कासवाचे वळण हे रात्रीच्या सुमारास होत असते, जेव्हा ती अंडी घालण्यासाठी किनाऱ्यावर येते. तथापि, वर्दळ वाढल्यामुळे वाळू दबली जाते आणि त्यामुळे कासवाला खड्डा करणे कठीण होते.


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

ई-निविदा सूचना क्र : पमपा/ सा.बां. (श.अ.)/२२२४/प्र.क्र.०९/६८६/२०२४ दिनांक : १६/१२/२०२४

| अनु. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | ई-निविदा किंमत रक्कम रुपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथील के.एल.-४,प्लॉट-१६, सेक्टर ४ ई येथे खेळाचे मैदान विकसित करणे (द्वितीय वेळ) | PMC/PWD/CE-/06/2024-25 | २,९१,४३,४३५/- (GST वगळून) | २,३६०/- | १२ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १७/१२/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.६११/६१२/२०२४
दिनांक : १६/१२/२०२४

**सही/-**
**(डॉ. प्रशांत रसाळ)**
**अतिरिक्त आयुक्त-।**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**



**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | राधूबाई तुकाराम खुटारकर व इतर, राहणार नावडे, ता. पनवेल, जि. रायगड | ०२ भेंड, ०२ अशी एकूण ०४ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. ०३, सेक्टर नं.फेज-२, नावडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील प्लॉटच्या आवारातील ०२ भेंड व ०२ अशी एकूण ०४ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुर्नरोपण परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.६१२/६१३/२०२४
दिनांक : १६/१२/२०२४

**सही/-**
**(स्वरुप खारगे)**
सहा आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)
पनवेल महानगरपालिका



## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to Public at large that Our Client, **M/S. Devam Lifespaces Partnership Firm** through its Partner **1. Prabhulal Nanji Patel, 2. Mr. Dharamshi Bhachu Bambhaniya, 3. Mr. Pareshkumar Narsinh Saraiya, 4. Mr. Dhrutin Hirji Karotra. 5. Mr. Piyush Parbat Gandhi Patel,** having office at **Unit No. 3:1, Building No. C-5/11, Plot No. 0006, Sector 04, CBD Belapur, Navi Mumbai,** have purchased Plot (more particularly described hereinunder) From Owners **1) Mr. Baban Shravan Thakur, 2) Mr. Mohan Shravan Thakur, 3) Smt. Shantabai Raghunath Gondali @ Shantabai Shravan Thakur, 4) Smt. Somubai Gopinath Thakur, 5) Mr. Shashikant Gopinath Thakur, 6) Mr. Pralhad Gopinath Thakur, 7) Smt. Suvarna Satish Kanekar @ Suvarna Gopinath Thakur**

**Description of Plot Allotted under 12.5% Scheme At Ulwe Node, Tal. Panvel, Dist. Raigad**

| Village Name/ Node | Plot No. | Sector | Area |
|---|---|---|---|
| Ulwe Node, Gavhan Village, Tal-Panvel, Dist - Raigad | 201 | 19 | 649.75 Sq.mtrs. |

Any person/s having any claim against or to the said Plot by way of sale, Mortgage, Charge, Gift, Lease, Easement, Use, Trust, Possession, Inheritance, Lien or otherwise however it is hereby required to make the same known to the undersigned at his office address given herein above within the period of 15 days from the date of publication hereof otherwise the transaction /sale will be completed without reference to such claims and the same if any will be considered as waived.

Date : 17/12/2024

**Sd/-**
**Pankaj V. Mandhare**
Advocate
UL-2/11, 702, 7th Floor, Sector 19A, Unnati, Ulwe, Panvel 410206. Mob. 9702416111
adv.pankajmandhare@gmail.com

# गणेश नाईकांच्या मंत्रिपदाचा नवी मुंबईत जल्लोष

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार गणेश नाईक यांनी नागपूर येथे कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतल्याने नवी मुंबईत एकच जल्लोष करण्यात आला. त्यांच्या समर्थकांनी फटाके उडवून, मिठाई वाटप करून उत्सव साजरा केला. ठिकठिकाणी अभिनंदनाचे बॅनर लावण्यात आले होते. नेरूळ स्टेशन येथे नेरूळ गाव प्रवेशद्वाराजवळ गणेश नाईकांच्या मंत्रीपदाच्या शपथविधीचा आनंद साजरा करण्यात आला.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते अक्षय पाटील यांनी लाऊड स्पीकर लावले होते. त्यावर गणेश नाईक यांच्यावर आधारित रचलेल्या शिल्पकार गाणे वाजवले जात होते. त्यासोबत गणेश नाईक यांनी घेतलेली 'मंत्रिपदाची शपथ' ऑडियो स्वरुपातील सातत्याने लावली जात होती. यासह मंत्री गणेश नाईक यांच्यावर रचलेली अनेक गीते



या वेळी लावण्यात आली होती. या वेळी फटाके उडवून अक्षय पाटील व त्यांच्या समर्थकांनी आनंद साजरा केला. या वेळी माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे, देवनाथ म्हात्रे, जयंत म्हात्रे, हरेश भोईर, दिलीप पाटील, संदिप निकम, शेखर भोपी, संदेश गायकवाड यासह अनेक गणेश नाईक समर्थक उपस्थित होते.

नवी मुंबई भाजपच्या वतीने वाशीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत यांच्या नेतृत्वात साजरा झालेल्या या जल्लोषात फटाके फोडून आणि मिठाई वाटून आनंद व्यक्त करण्यात आला.

कोपरी गावातील सामाजिक कार्यकर्ते परशुराम ठाकूर यांनी देखील गणेश नाईक यांना मंत्रिपद मिळाल्याबद्दल परिसरात आनंद व्यक्त केला. नागरीकांना मिठाई वाटण्यात आली. फटाके उडविण्यात आले. या वेळी परशुराम ठाकूर म्हणाले की, गणेश नाईक हे तब्बल १० वर्ष मंत्रिपदापसून दूर होते.त्यामुळे नवी मुंबईचा विकास मागे पडला आहे. आता गणेश नाईक यांना मंत्रिपद मिळाल्याने नवी मुंबई विकासात आघाडीवर राहील असे ठाकूर म्हणाले.

### लाऊड स्पिकरवर ऐकवला शपथविधी

### समर्थकांकडून फटाके फोडून मिठाईचे वाटप

*गणेश नाईक म्हणजे आमचे दादा आज मंत्री झाले. ही आमच्यासाठी सर्वात मौल्यवान भेट आहे. आम्ही गणेश नाईक यांचे समर्थक असून दादांमुळे नवी मुंबईत विकासाच्या आघाडीवर होती. गेल्या दहा वर्षांत नवी मुंबई तुलनेत मागे पडली होती, मात्र आता ती पुन्हा मूळ पदावर येईल. पालिकेचा कारभारदेखील आता सुरळीत होऊन कोणावरही अन्याय होणार नाही, अशी आम्हा नाईक समर्थकांना पूर्ण खात्री आहे.*

**-राहुल शिंदे, कार्यकर्ते, ऐरोली, भाजप**

## निवडक

### गजआनन म्हात्रेंच्या पुस्तकास पुरस्कार

**नवी मुंबई :** ज्ञानेश्वरीत साठ बोलीभाषेतील शब्द आहेत. याचे संशोधन करून नवी मुंबई करावे गावातील साहित्यिक गजआनन म्हात्रे यांनी ज्ञानेश्वरीतून १३८ आगरी शब्द शोधून, ओवी/अध्याय क्रमांक देऊन, शब्दाचा अर्थ सांगून, वाक्यात उपयोग करून 'आगरी भाषा सौंदर्य' या पुस्तकात सांगितला आहे. हे आगरी भाषा सौंदर्य पुस्तक म्हणजे आगरी बोलीचे एक संशोधन आहे. ८ जून २४ रोजीनवरंग साहित्य संमेलनात प्रकाशित झालेल्या या पुस्तकाचे समाज माध्यमातून खुप कौतुक झालेले आहे. त्याची दखल अखिल आगरी महोत्सव डोंबवली यांनी ११ डिसेंबर २४ रोजी व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते म्हात्रे यांना आगरी साहित्य पुरस्कार २०२४' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### स्वरा मोरे हिला दोन सुवर्णपदके

**पनवेल :** अखिल भारतीय कलादर्पणतर्फे पुणे येथे



स्पर्धेचे आयोजन करण्यात आले या स्पर्धेमध्ये २डी रेखाचित्र रंग भरणे स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, पिंपरी, पुणे इयत्ता पाचवीमध्ये शिकणाऱ्या स्वरा अनिता रणजीत मोरे हिने अखिल भारतीय कलादर्पण स्पर्धेत २ डी रेखाचित्र आणि रंग ह्या दोन्ही स्पर्धेमध्ये दोन सुवर्णपदक मिळविले. या घवघवीत यश संपादनाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे. भविष्यामध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उतरून सुवर्णपदकावरती नाव करणार, असे मत स्वरा अनिता रणजीत मोरे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

### सुकापूर येथे सुरक्षेसंदर्भात बैठक



**पनवेल :** खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या सुकापूर येथील बालाजी सिम्फोनी सोसायटीमध्ये सुरक्षा बैठक वपोनि स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. या वेळी सपोनि बळवंत पोलीस पाटील यांनी उपस्थित सोसायटीमधील रहिवाशांना व पदाधिकाऱ्यारंना सुरक्षितता जनजागृतीबाबत मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने सायबर सुरक्षा, डायला १९३०, ११२, नवी मुंबई व्हॉट्सअॅप चायनल, सायबर सेफ नवी मुंबई, ऑफिशियल युट्युब चायनल बाबत माहिती दिली. या बैठकीला रहिवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तसेच आपल्या विविध शंकांचे निरसन केले.

## जेएनपीएमधील मल्टीपर्पज हॉलजवळ प्रशस्त किचन व डायनिंगचे उद्घाटन



**उरण : बातमीदार**

जेएनपीएमधील मल्टीपर्पज हॉलच्या बाजूला किचन व डायनिंग इमारत उभारण्यात आली आहे. या किचन व डायनिंग हॉलचे उद्घाटन जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांच्या हस्ते फीत कापून झाले.

नागरिकांच्या, प्रकल्पग्रस्तांच्या अडीअडचणी लक्षात घेऊन जेएनपीएमधील मल्टीपर्पज हॉलच्या बाजूला मोठे प्रशस्त व सर्व सुख सुविधांनी युक्त सुसज्ज असे लग्न समारंभ इतर कार्यक्रमासाठी लागणारे किचन व डायनिंग व्हायला पाहिजे, अशी संकल्पना मांडत सदर किचन आणि डायनिंग हॉलसाठी जेएनपीटीचे विश्वस्त दिनेश पाटील, विश्वस्त रवि पाटील, माजी विश्वस्त भूषण पाटील यांनी जेएनपीए प्रशासनाकडे पाठपुरावा केला.

शेवटी सर्व विश्वस्तांचे मागणी व स्थानिक भूमीपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे भावना लक्षात घेता जेएनपीए प्रशासनाने जेएनपीए मल्टीपर्पज हॉलच्या शेजारी भव्य दिव्य व सर्व सेवा सुविधायुक्त असे किचन व डायनिंग हॉल बांधण्यास मंजुरी दिली. मंजुरी मिळाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यातच अल्ट्रोप्रो इन्फ्रास्टेक्चर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून सीजीएस कन्स्ट्रॅकशनचे सब कॉन्ट्रॅक्टर विकास नाईक यांनी उत्तम व सुंदर असे किचन आणि डायनिंग हॉल बांधले.

हॉलच्या उद्घाटनावेळी जेएनपीएचे विश्वस्त दिनेश पाटील, विश्वस्त रवी पाटील, माजी विश्वस्त भूषण पाटील, ॲडमिनिस्ट्रेशन विभाग प्रमुख मनीषा जाधव, ट्रॅफिक विभागाचे गिरीष थॉमस, एमअॅडई ईचे सुरेश बाबू, पिपीडी विभाग प्रमुख डॉ. वैद्यनाथन, डॉ. संजय उगले, जेएनपीए हॉस्पिटल इन्चार्ज डॉ. वर्षा यादव, अल्ट्रोप्रोचे कवळजीत सेन, सीजीएस कंट्रकशनचे सब कॉन्ट्रॅक्टर विकास नाईक आदी उपस्थित होते.

## नेरे येथे स्वच्छता मोहीम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन प्रगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर मानेच्या विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सोमवारी (दि.१६) नेरे पनवेल येथे श्रमदान व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

रामशेठ ठाकूर महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच समाज हितासाठी वेगवेगळे सामाजिक, पर्यावरणीय व शैक्षणिक उपक्रम घेत असते त्याचाच एक भाग म्हणून श्रमदान व स्वच्छता करण्यात आली. या श्रमदानासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी शांतीवन नेरे येथील आधार गृह परिसर तसेच नर्सरी विभागातील स्वच्छता व श्रमदान केले.

या वेळी विद्यार्थ्यांनी आधारगृहांमधील वयस्कर लोकांना भेटून त्यांच्याशी हितगुज साधले व त्यांच्या चेहऱ्यावर एक आशेचा किरण पाहिला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कौतुक केले व पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. नीलम मोरे तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## मोहोपाडा येथे अखंड हरिनाम सप्ताह

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा वेथील जनता विद्यालयाच्या भव्य मैदानात रसायनी येथील वारकरी सांप्रदाय प्रसारक मंडळातर्फे अखंड हरिनाम सप्ताह



व तुकाराम गाथा पारायण हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा मोठ्या भक्तीभावाने झाला.

या सोहळ्याला रोज हजारोंच्या संख्येने वारकरी आणि परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत होते. सायंकाळी ४ ते ५ स्थानिक महाराजांचे प्रवचन होत होते. तर सायंकाळी ७ ते ९ किर्तन संपन्न होत असे. हभप माधव महाराज रसाळ (बारामती), हभप पुंडलीक महाराज देहूकर, (देहू), हमप नरहरी महाराज सांगळे (आळंदी), हमप पंडीत महाराज क्षिरसागर (आळंदी), हभप जलाल महाराज सय्यद (नाशिक), हभप श्रीपाद महाराज जाधव (सातारा), हभप जयवंत महाराज गोसावी (त्रंबकेश्वर) यांचे सुश्राव्य किर्तन पार पडले.

दिंडी उत्सव जनता विद्यालय मैदान ते मोहोपाडा बाजारपेठेतून श्री दत्त मंदिर अशी हरिनामाचा गजरात पालखी काढण्यात आली. यानंतर दिपोत्सवाचा कार्यक्रम झाला. माजी सरपंच संदीप मुंढे व सरपंच उमाताई मुंढे यांच्या हस्ते हभप पांडुरंग महाराज घुले यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला तसेच काल्याचा महाप्रसाद माजी सरपंच संदीप मुंढे यांच्याहस्ते देण्यात आला. या वेळी मोठ्या संख्येने वारकरी आणि रसायनी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## युईएस स्कूलमध्ये आंतरशालेय स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ



**उरण : वार्ताहर**

आंतरशालेय स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ नुकताच युईएस स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेजमधील उमेश प्रधानसर सभागृहामध्ये झाला.

या वेळी युईएस संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, ज्येष्ठ सदस्य व खजिनदार चंद्रकांत ठक्कर, स्कूल आणि ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व-प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका, समन्वयक, युईएस शाळेतील शिक्षक व इतर शाळेतील शिक्षक तसेच विजयी विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.

बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमात युईएस संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर तसेच ज्येष्ठ सदस्य व खजिनदार चंद्रकांत ठक्कर हस्ते सर्व विजयी विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर ह्यांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.

सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, स्वागत व आभार माध्यमिक विभागाच्या शिक्षिकेने मानले.

## ग्रंथ प्रदर्शनातून अध्यात्मप्रसार

**नवी मुंबई : बातमीदार**

सनातन संस्थेच्या वतीने दत्त जयंतीच्या निमित्ताने नवीमुंबई येथे एकूण सात ठिकाणी विविध दत्त मंदिरांजवळ ग्रंथप्रदर्शने लावून अध्यात्मप्रसार करण्यात आला. या ग्रंथ कक्षांच्या माध्यमांतून अध्यात्म आणि साधनेविषयी अलौकिक ज्ञान असलेले सनातनचे ग्रंथ भाविक आणि जिज्ञासू यांच्यासाठी उपलब्ध करण्यात आले. या सर्व ग्रंथप्रदर्शनांना भेट देणारे भाविक आणि जिज्ञासूंचा उत्तम प्रतिसाद लाभला.

### सनातन संस्थेतर्फे दत्त जयंतीच्या निमित्ताने उपक्रम

दत्तगुरूंच्या उपासनेविषयीच्या ग्रंथांसह सनातन संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेली अध्यात्म, साधना, देवतांची उपासना, आचारधर्म, धर्माचरण, बालसंस्कार, राष्ट्ररक्षण, धर्मजागृती, आपत्काळविषयीची सिद्धता, आयुर्वेद, आरोग्य आदी विषयांवरील ग्रंथमालिकेतील ग्रंथ तसेच सात्त्विक उत्पादनांचे येथे वितरण करण्यात आले. सनातनच्या अनेक ग्रंथपदर्शनांवर या वेळी अनेक जिज्ञासूंनी साधना, वास्तूशुद्धी आदी विषयांवर शंकानिरसनही करून घेतले, तसेच दैनंदिन जीवनात धर्माचरण आणि साधनेसाठी करावयाच्या कृतीसुद्धा काही जिज्ञासूंनी समजून घेतल्या.

दत्तजयंतीच्या पार्श्वभूमीवर डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच दत्त उपासनेचे शास्त्र जिज्ञासूंना कळावे यासाठी व्याख्याने, फलक प्रसिध्दी, सोशल मिडीया आदी माध्यमातूनही लोकांचे प्रबोधन करण्यात आले.

## दत्त जयंतीनिमित्त उरणची यात्रा

**उरण : वार्ताहर**

सालाबादप्रमाणे यंदाही श्री दत्त जयंतीनिमित्त उरण तालुक्याची यात्रा शनिवारी (दि. १४) असल्याने विविध ठिकाणी श्री. दत्त मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. उरण शहर सह ग्रामीण भागात श्री दत्त मंदिरात दत्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



उरण शहरातील देवूळवाडी येथील दत्त मंदिरात श्री दत्त जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे गुरुजी (महाराज) ओमकार बैरागी यांनी सांगितले.

यात्रेनिमित्त उरण शहरात खेळणी, शोभेच्या वस्तू ,मिठाई चे स्टॉल, आकर्षक शोभेच्या वस्तू विकावयास आल्या होत्या. उरण तालुक्यातील केगाव हद्दीतील विनायक येथील जगदीश कोळी व कुटुंबियांचे एक मुखी दत्त मंदिरात पालखी सोहळा, महाप्रसाद याचे आयोजन करण्यात आले होते. बालई येथील संजय भोईर कुटुंबियांचे दत्त मंदिर येथे विविध कार्यक्रम, बोरी नाका येथील परेश तेरडे यांच्या दत्त मंदिरात विविध कार्यक्रम आयोजन करण्यात आले.

उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## नेरूळमध्ये दत्त जयंती सोहळा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवयुग पंचपरमेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित पंचपरमेश्वर मंदिराचा वर्धापन दिन आणि दत्त जयंती सोहळा नेरूळ सेक्टर १० येथील मंदिरात मोठया धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. या वेळी आमदार गणेश नाईक यांनी श्री दत्त जयंती उत्सवात सहभागी होत दर्शन घेतले.

हा सोहळा अध्यक्ष नवनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया धार्मिक वातावरणात झाला. नवीन कुकशेत देवस्थान समितीचे निमंत्रक माजी नगरसेवक सुरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात श्री दत्त जयंती सोहळा साजरा करण्यात आला. या वेळी भाविकांनी दर्शन आणि फराळाचा लाभ घेतला.

सारसोळे ग्रामस्थ मंडळ आयोजित हनुमान दत्त मंदिर वर्धापन दिन आणि दत्त जयंती उत्सव मोठया धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. या वेळी बुवा गणपत भोपी आणि बुवा वनराज म्हात्रे यांचे सुस्वर भजनाने भक्तांना मंत्रमुग्ध केले. जयेश मेहेर, मनोज वैती, संदीप मेहेर, विश्वास तांडेल आणि अर्जुन मढवी यांनी श्री दत्त जयंती जन्मोत्सवाच्या सोहळ्याला आलेल्या भक्तांचे स्वागत केले.

पंचपरमेश्वर वर्धापन दिनी विविध धार्मिक विधी करून सायंकाळी पालखी मिरवणूक व भव्य दिंडी पदक्षिणा काढण्यात आली. हभप नवनाथ महाराज माशेरे यांचे श्री हरि कीर्तन झाले.

श्री दत्त जयंती सोहळ्यात पंचपरमेश्वर महिला भजन मंडळाचे सुस्वर भजन तर हभप सुरेश महाराज जाधव यांचे श्री दत्त जन्माचे कीर्तन झाले. दोन दिवसीय धार्मिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने येऊन भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

## नवी मुंबई महापालिकेच्या विशाखा समितीतर्फे विशेष माहिती सत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

विशाखा समितीच्या कार्यपद्धतीविषयी व सदस्य म्हणून असणारे कर्तव्य याबाबत माहिती देण्याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेतील नवनियुक्त विशाखा समिती सदस्यांसाठी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष माहितीसत्र आयोजित करण्यात आले होते.

महानगरपालिकेमध्ये सन २००६ पासून विशाखा समिती कार्यरत आहे. १९९४ मध्ये महिला तक्रार समितीची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर सन २०२३ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने १९९७ मध्ये जारी केलेल्या (विशाखा निकाल) कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंधावरील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यासाठी तिला विशाखा समिती असे नाव दिले.



या समितीच्या कार्यपद्धतीविषयी व सदस्य म्हणून असणारे कर्तव्य याबाबत माहिती देण्याकरिता या माहिती सत्रामध्ये विशाखा समितीच्या अशासकीय सदस्य ॲड. हेमांगी पाटील यांनी विशाखा समितीची स्थापना, कार्यपद्धती, कायदेशीर बाबी अशा अनेक मुद्द्यांबाबत विस्तृत माहिती सदस्यांना दिली. या वेळी नवी मुंबई महानगरपालिका मध्यवर्ती विशाखा समिती तसेच महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत विशाखा समिती आणि आरोग्य विभाग अंतर्गत विशाखा समिती अशा तिन्ही समितीच्या सदस्यांना या माहिती सत्रातून विशाखा समितीच्या कामकाजाविषयी अवगत करण्यात आले.

या वेळी नमुंमपा विशाखा समितीच्या अध्यक्ष तथा उपायुक्त अभिलाषा म्हात्रे यांनी यापुढील काळात महानगरपालिकेतील विशाखा समिती कशाप्रकारे काम करणार आहे या विषयीचे नियोजन सांगितले. महानगरपालिकेमध्ये कार्यरत असणाऱ्या विविध विभागातील महिला कर्मचारी यांना विशाखा समितीबाबत माहिती देऊन जागरूकता निर्माण करण्यात येईल, अशी माहिती दिली. याकरिता नजिकच्या काळात परिमंडळ एक व परिमंडळ दोन अशाप्रकारे महिला कर्मचाऱ्यांकरिता लैंगिक छळ प्रतिबंध व उपाय यादृष्टीने विशाखा समितीची कार्यशाळा घेण्यात येणार असल्याचे सांगत त्यांनी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयामध्ये कार्यरत महिला कर्मचाऱ्यांकरिताही विशेष सत्र आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

सर्व शासकिय / निमशासकिय कार्यालयांप्रमाणेच नवी मुंबई महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी संतोषजनक व सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विशाखा समिती सक्षमतेने कार्यरत असणार आहे.

# कर्जत पालिका प्रशासनाविरोधात साखळी उपोषण

## समस्या सोडवण्याची समितीची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेचा कार्यकाळ २७ फेब्रुवारी २०२४ रोजी संपल्यामुळे मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्यावर प्रशासकीय जबाबदारी सोपवण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांत नागरी समस्यांवर कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने स्थानिक नागरिकांनी प्रशासनाविरोधात बेमुदत साखळी उपोषण सुरू केले आहे.

कर्जत शहर बचाव समितीने या आंदोलनाचे नेतृत्व केले असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी लढा उभारला आहे. प्रशासनाने या मागण्या गांभीर्याने घेत सकारात्मक पावले उचलावीत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. साखळी उपोषण साठी पहिल्या दिवशी समिती मधील ॲड. कैलास मोरे, ॲड. प्रीती तिवारी, निशा गुप्ता, राकेश डगले, प्रशांत सदावर्ते हे पाच प्रतिनिधी उपोषणास बसले आहेत. या समस्यांचे निराकरण तातडीने करण्यात आले नाही, तर नागरिकांनी आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

कर्जत नगरपरिषदेत कर्मचारीच ठेकेदार बनल्याने कामाची गुणवत्ता आणि भ्रष्टाचारी कामकाज यावर प्रशासनाचा



अंकुश नसल्याचा गंभीर आरोप कर्जत शहर बचाव समितीकडून करण्यात आला आहे. अलिकडेच कर्जत नगरपरिषद इमारतीला दहा वर्ष टिकून राहिलेला रंग पुन्हा रंगरंगोटी करताच एका पावसातच म्हणजे चार महिन्यातच उडाला आहे. यामध्ये रंगाचे कामात गुणवत्तेला प्राधान्य दिले नसल्याची चर्चा आहे.

नागरिकांच्या मुख्य समस्या व नागरिकांच्या मागण्या यामध्ये नियमित व शुद्ध पाणीपुरवठ्याचा अभाव, गळतीमुळे पाण्याचा अपव्यय, त्यामुळे पाईपलाइनचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी, डासांचा प्रादुर्भाव आणि डेंग्यू-मलेरियासारख्या आजारांचा धोका, नगरपरिषदेच्या हलगर्जीपणामुळे कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने आरोग्यावर परिणाम, बाजारपेठेतील वाहतूक कोंडी, हातगाड्यांमुळे रस्ते अपूर्ण आणि अडथळे, अनधिकृत विक्रेत्यांवर कारवाईची मागणी, रस्त्यांचे अपूर्ण काम तसेच रस्त्यावरील खड्डे, रुंदीकरणानंतरही रस्त्यांवर विजेचे खांब आहेत. यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे.

चोऱ्या व गुन्हेगारी नियंत्रणासाठी सीसीटीव्ही यंत्रणा तातडीने बसवण्याची मागणी, गुंडगे भागातील डंपिंग ग्राउंडमुळे परिसरात दुर्गंधी व आरोग्यविषयक समस्या, क्रीडानगरी प्रकल्प आणि इतर विकासकामे, आमराई क्रीडानगरी प्रकल्प अद्याप अपूर्ण, मच्छी मार्केट व भाजी मंडई सुधारण्याची मागणी, उल्हास नदी प्रदूषण, सांडपाणी नदीत सोडले जात असल्याने प्रदूषण वाढले आहे, एस टी पी (सीवेज ट्रीटमेंट प्लांट) कार्यान्वित करणे अत्यावश्यक.आहे

उपजिल्हा रुग्णालयाची परिस्थिती भयानक असून दर्जेदार आरोग्य सेवांची कमतरता आहे, अधिक सुविधा व तज्ञ डॉक्टरांची उपलब्धता सुनिश्चित करावी. २०१३ साली एम एम.आर. डी.ए.माध्यमातून कर्जत शहरातील गटारे बंदिस्त करण्यास सुरुवात झाली होती. उर्वरित उघडी राहिलेली गटारे आजतागायत बंदिस्त झालेली नाहीत. आमराई क्रीडानगरी साठी करोडो रुपयाचा निधी खर्च करण्यात आलेला आहे. ११ वर्ष उलटूनही क्रीडानगरी पूर्णत्वास नाही. मूलभूत सुविधा सोडून नगरपालिकेने गुंडगे भागात सात कोटी खर्च करून सर्प केंद्र (स्नेक पार्क) उभारण्याचे काम सुरू केले आहे.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या निवेदनांनंतरही प्रशासनाने कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत. यामुळे नागरी समस्यांबाबत प्रशासनाची उदासीनता उघड झाली आहे. नागरिकांचा लढा प्रशासनाला जागे करून कर्जत शहराच्या विकासासाठी ठोस निर्णय घेण्यास भाग पाडण्याचा आहे.

# माणगाव बसस्थानकाच्या नूतनीकरणासाठी निधी मंजूर

## प्रवाशांना मिळणार सुविधांसह दिलासा

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्याचे नवनिर्वाचित कॅबिनेट मंत्री ना.भरत गोगावले यांच्या अथक प्रयत्नांनंतर माणगाव एसटी बस स्थानकाच्या नुतनी करणासाठी दिड कोटी रुपये मंजूर झाले आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय संपणार असून त्यांना या मंजुरीमुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

या नुतनीकरणाची निविदा यापूर्वीच प्रसिद्ध झाली असून लवकरच हे काम सुरू होणार आहे. गेल्या वर्षी बसस्थानका समोरील सिमेंट काँक्रीटकरणा साठी १६ लाख रुपये खर्च आला आहे. तर दोन महिन्यांपूर्वी काँक्रीटीकरणा साठी १ कोटी २ लाख रुपये मंजूर झाले होते. त्यांचे कामही काही दिवसात पूर्ण होणार असुन एकूण २ कोटी ६२ लाख रुपये ना.भरत गोगावले यांनी मंजूर करून आणले आहेत.



अनेक वर्षांपासून प्रवाशांना तुंबलेले पाणी, खाच खळगे आणि मोठमोठ्या खड्ड्यातून बस स्थानकात प्रवेश करावा लागत होता. यासाठी विविध सामाजिक संघटनांनी आंदोलन केले होते. हे खड्डे कायमस्वरूपी नष्ट होण्यासाठी या आवाराचे काँक्रीटीकरण व्हावे म्हणुन जिल्हा युवा सेना प्रमुख विपुल उभारे यांनी आंदोलन केले होते. ना.भरत गोगावले यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यामुळे माणगाव बस स्थानकाचे काँक्रीटीकरण आणि नुतनीकरण मंजूर झाले. यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

या नुतनीकरणासाठी मंडळाने १ कोटी ४४ लाख ३७ हजार ३०३ रुपये मंजूर केले आहेत. या कामात गटारे, प्लास्टर, छप्पर, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, लाईट, फर्निचर, आसन व्यवस्था, विविध कक्ष आदी सर्व प्रकारच्या सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. त्यामुळे हे स्थानक आधुनिक आणि सुसज्ज होणार आहे.

# माणगाव हद्दीत मोकाट कुत्री झाली उदंड

**माणगाव : बातमीदार**

अनेक दिवसांपासून मोकाट फिरणारे श्वान (कुत्रे) माणगांव नगरपंचायत हद्दीतील जवळपास सर्वच प्रभागात आपणास गल्लीबोळातून सहज फिरताना पाहावयास मिळत आहेत. या मोकाट श्वानांचे संख्येत फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे.

काही कुत्र्यांची अवस्था तर अत्यंत दयनीय असुन मानेवर जखमा, तोंडातून लाळ गळत, लुत लागल्याने अंगावर केस नसल्या अवस्थेत हे कुत्रे शहरातील कचरा कुंड्या व बाहेर पडलेल्या घाणीवर खाण्याच्या शोधात तुटून पडत मोकाट फिरत यांनी माणसाला चावा घेतल्यास



नाहक भुर्दंड व रेबीजची लागण होण्याची भिती नागरिकांचे मनात असते.

शहरातील नागरिकांस आपल्या दैनंदिन कामानिमित्त तसेच शालेय विद्यार्थ्यांस शाळेत येता जाता, बाजारहाट करणाऱ्या महिला, मुल, जेष्ठ नागरिक, काम धंद्यानिमित्त येणारे जाणारे सर्वच कर्मचारी, फेरीवाले, पेपर टाकणारे, मोल मजुरी करणारे आदिवासी सर्वांनाच या मोकाट कुत्र्यांचे सतत भय वाटत असुन हे कुत्रे कधी अचानक चावा घेतील याचा नेम उरला नाही, अशी भिती व्यक्त केली जात आहे.

याबाबत माणगाव नगरपंचायत प्रशासनाने तातडीने काहीतरी ठोस उपाययोजना करुन या श्वानांची वाढ व उपद्रव कसा थोपवता येईल, त्यांचा बंदोबस्त कसा करता येईल यावर तातडीने लक्ष वेधून काहीतरी ठोस उपाययोजना अंमलात आणावी; अन्यथा यापुढे नागरिकांचे जीवन मात्र धोक्यात येण्याची दाट शक्यता आहे.

# मार्गशिर्षामध्ये फळा-फुलांची मागणी वाढली

**खोपोली : प्रतिनिधी**

मार्गशीर्ष हा महिना महीलावर्गासाठी अत्यंत पवित्र मानला जात असल्याने रोज लक्ष्मी मातेची यथासांग पुजा केली जात आहे. विशेषता दर गुरुवारी लक्ष्मी मातेच्या मुखवट्यांची पुजा केली जात असल्यामुळे, बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात फळे विक्रीस ठेवण्यांस आली.असून फळांचा प्रसाद म्हणून महिलावर्ग सायंकाळी ग्रहण करीत असतात. त्यामुळे फळे तसेच फुले यांची मागणी वाढली आहे.



या मार्गशीर्ष महिन्यात महिलावर्ग स्वत: उपवास करून घरामध्ये मांसाहार वर्ज्य केले जात असते. कुटुंबातही असलेले सद्स्य महिनाभर मांसाहार वर्ज्य असते. त्यामुळे साहजिकच मन पवित्र राहत असते. दर गुरुवारी फळा-फुलांनी तसेच पूजेला लागणार्या साहित्यांनाही चांगली मागणी असल्याने फळे-फुले यांची मागणी वाढली आहे.

मार्गशीर्ष महिन्यात येणार्या चार गुरुवारी हा सोहळा साजरा करण्यात येत असतो. तसेच शेवटच्या गुरुवारी उद्यापन केले जाते.एकंदरीत या महिन्यात प्रत्येक गुरुवारी घराघरांमध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झालेले प्रत्येकांच्या घरी पहावयास मिळत आहे.


# पद्मदुर्ग स्वच्छता व संवर्धन मोहीम

## असंख्य शिवप्रेमींनी उपस्थित राहावे -आशिलकुमार ठाकूर

**मुरुड : प्रतिनिधी**

पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संस्थांच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदा ही २२ डिसेंबर सकाळी ७.३० वाजता पद्मदुर्ग किल्ल्यात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. शेकडोंच्या संख्येने शिवप्रेमी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन संख्याचे अध्यक्ष आशिलकुमार जगन्नाथ ठाकूर यांनी केले.

प्रथम किल्ल्यात गड पुजन तद्नंतर दुर्गादेवी कोटेश्वरी मातेचे पुजन करण्यात येणार आहे.त्यानंतर संपुर्ण किल्ल्याची स्वच्छता व संवर्धन करण्यात येणार आहे.त्याकरिता सर्व शिवप्रेमींनी स्वच्छतेकरिता लागणारी हत्यारे कोयता,



झाडु,पारय,पंजा,पिकाव,फावडे इत्यादी साहित्य घेऊन २२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ७.३० वाजता मुरुड खोराबंदर याठिकाणी सर्वांनी एकत्र येऊन बोटीने पद्मदुर्ग किल्लात यायचं आहे.

या स्वच्छता मोहीमेत शिवप्रेमीनी सहभाग घेऊन राजे शिवछत्रपती महाराजांना मानवंदना देऊया तरी चला पद्मदुर्ग किल्लावर शेकडोच्या संख्येने असे आवाहन ठाकूर यांनी केले आहे.

## जवाहर नवोदय विद्यालयासाठी १८ जानेवारी रोजी प्रवेश परीक्षा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पीएमसी स्कूल जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथील इयत्ता सहावीसाठी प्रवेश परीक्षा १८ जानेवारी २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील एकूण १५ तालुक्यातील परीक्षा केंद्रावर होणार आहे. त्यासाठीचे प्रवेश पत्र https:// cbseitms.rcil.gov.in/nvs/-dminCard/-dminCard d https:// navodaya.gov.i वेबसाईटवरून संबंधित उमेदवारांनी डाउनलोड करून घ्यावेत, अशी माहिती विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य मनोज राऊत यांनी दिली.

विद्यार्थी रजिस्ट्रेशन क्रमांक व जन्मतारीख हे ओळखपत्राचे पासवर्ड असणार आहेत. सर्व परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी १८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे. विद्यार्थी आणि पालकांना काही माहिती हवी असेल तर त्यांनी संतोष चिंचकर ९८८१३५१६०१, अर्जुन गायकवाड ९८६२७९३६४०, वर्षा सावंत ७२७६००८३९९ यांच्याशी संपर्क साधावा.

# कोशिंबळे आदिवासीवाडी शाळेला 'टाटा मोटर्स'तर्फे शुद्ध पाण्याची यंत्रणा

**माणगाव : बातमीदार**

पुण्यातील टाटा मोटर्स कंपनीच्या कर्मचारीवर्गाने स्वतःच्या वैयक्तिक सहभागातून निजामपूरजवळच्या कोशिंबळे आदिवासीवाडी शाळेसाठी स्वच्छ आणि शुध्द पाणी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध व्हावे या हेतूने पाच हजार लिटरची टाकी आणि वॉटर प्युरिफायर मशीन भेट स्वरुपात दिली.

कोशिंबळे आदिवासीवाडी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र सुविधा उपलब्ध नव्हती. ही बाब लक्षात घेऊन इतिहास अभ्यासक रामजी कदम यांनी टाटा मोटर्स कंपनीतील कर्मचारीवर्गाशी याबद्दल मागणी केली.टाटा मोटर्सच्या कर्मचाऱ्यांनी वैयक्तिक आर्थिक सहकार्यातून पाणी टाकी आणि वॉटर प्युरिफायर मशीन उपलब्ध करून दिली. या संपूर्ण यंत्रणेचे लोकार्पण कंपनीचे युनिट हेड रवींद्र घरत, किशोर देशमुख, हितेश पवार, अण्णासाहेब शिंदे, राजेश साळी आणि संपूर्ण टीमच्या उपस्थितीत



करण्यात आले. या वेळी रवींद्र घरत यांनी भविष्यात शाळेसाठी आवश्यक सोयीसुविधा, वृक्षारोपण, अद्ययावत शालेय अभ्यासक्रम याबद्दल सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास टाटा मोटर्सचे अधिकारीवर्ग, निजामपूर केंद्रप्रमुख शिनगारे, इतिहास अभ्यासक रामजी कदम, मुख्याध्यापक नयन शेडगे, अंगणवाडी सेविका, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष उपस्थित होते.

## नाणोरे शाळेचे क्रीडा आणि व्यक्तिमत्व विकास स्पर्धेत यश



**माणगाव : प्रतिनिधी**

नाणोरे शाळेचे बीट स्तरावरील क्रीडा आणि व्यक्ती महत्व विकास स्पर्धा मध्ये लहान गट नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक उतेखोल केन्द्रातील नाणोरे शाळेने पटकावला. त्याबद्दल व्यवस्थापन समितीने मुलांचे विषेश कौतुक केले.

व्यवस्थापन समिती अध्यक्ष अन्वी मासूक, उपाध्यक्ष शर्वरी शिगवण तसेच सर्व सदस्य,मातापालक यांनी सभा घेऊन विद्यार्थी आणि शिक्षकांचा सन्मान केला. मुख्याध्यापक वाटवे आणि व्यवस्थापन अध्यक्षा यांनी केंद्र प्रमुख शंकर शिंदे,विनया जाधव,दिनेश खडतर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. मुलांचा आनंद द्विगुणित करणेसाठी केक कापून मुलांना खाऊ देण्यात आला.

माणगाव नगरपंचायत हद्दीतील नाणोरे शाळेचा पट १५ असून पूर्ण शाळेतील १५विदयार्थावर्गाने या नृत्यात सहभाग घेतला होता.१०० टक्के विद्यार्थी सहभागी करुन मुलांचे व्यक्तिमत्त्व विकास करणेत दोन्ही शिक्षिका उत्कृष्ट कामगिरी करताना दिसत आहेत असे उपस्थित मान्यवरांनी मत व्यक्त केले.शिक्षणप्रेमी सदस्य समाधान उतेकर यांचाही विषेश उल्लेख मुख्याध्यापक वाटवे बाई यांनी केले.सदैव परिश्रमाने फुलणारी ही विद्यार्थी फुलबाग अशीच फुलत राहो असे ग्रामस्थांनी मत व्यक्त केले.

## माथेरानमध्ये निसर्गाच्या सानिध्यात आजी-माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

**माथेरान :प्रतिनिधी**

माथेरानमध्ये शिक्षणाचा पाया घालणाऱ्या शांताराम यशवंत गव्हाणकर या शाळेच्या व वीर हुतात्मा भाई कोतवाल नगर परिषद प्राथमिक शाळेच्या आजी-माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन येथील निसर्गाच्या सान्निध्यात शाळेच्या आवारात उत्साही आणि आनंदी वातावरणात येथील स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत पार पडले.

माथेरानच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल नगरपरिषद शाळेच्या पटांगणात या कार्यक्रमाचे आयोजन माथेरान नगरपरिषद आणि दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक तसेच शिक्षक वृंद यांच्या वतीने करण्यात आले होते.शनिवार व रविवार असे दोन दिवस सुरू असलेल्या स्नेहसंमेलनात सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे उत्तम सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.यावेळी वयाच्या पन्नाशीत पोहचलेल्या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य कला,सुमधुर गाणी,एकांकिका सादर केल्या.

शाळेकडून आयोजित करण्यात आलेल्या या स्नेहसंमेलनामुळे सर्व माजी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा एकत्र येऊन व सर्वांना भेटून जुन्या आठवणींना उजाळा देता आला.या स्नेहसंमेलनाच्या शुभारंभ प्रसंगी गव्हाणकर शाळेचे विश्वस्त शशिभूषण गव्हाणकर शाळेच्या मुख्याध्यापिका विदुला गोसावी,सेंट झेव्हियर स्कूलच्या मुख्याध्यापिका सिस्टर फिलोमीना जेम्स,नगरपरिषद शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अहिरे,सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने तसेच माथेरान नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी वृंद,सर्व शिक्षक वृंद,आजी माजी पालक आणि माथेरान शहरातील नागरिक उपस्थित होते.



# माणगावात पादचारी पूल आणि सिग्नलची गरज

## विद्यार्थ्यांसह नागरिकांना करावी लागते प्रतीक्षा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील सततच्या वाहतुकीच्या कोंडीने ज्येष्ठ नागरिक,विद्यार्थी,महिला आणि लहान मुले हैराण झाले आहेत. तसेच विद्यार्थ्यांची महामार्ग ओलांडताना नेहमी कोंडी होत आहे. त्यामुळे महामार्गावर कचेरी रोड, मोर्बा रोड आणि निजामपूर रोड चौकात सिग्नल यंत्रणा बसविण्यात यावी आणि पादचारी पूल बांधण्यात यावेत, अशी मागणी ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय शिंदे यांनी केली आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे १७ वर्षे रखडलेल्या अवस्थेत आहे. माणगाव शहरातील बाजारपेठेतील महामार्गाचे रुंदीकरण झालेले अद्यापही झालेले नाही. माणगाव हे तालुक्याचे ठिकाण असल्याने दररोज हजारो लोक विविध प्रकारच्या कामांसाठी शहरात येत असतात. महामार्ग अरुंद असल्याने चालणे देखील अवघड झाले आहे. काही व्यावसायिकांनी बेकायदेशीर आणि अनाधिकृत बांधकामे करुन लहान मोठी दुकाने रस्त्यावर थाटली आहेत. त्यामुळे रस्त्याने चालणे देखील मुश्किल झाले आहे. निजामपूर आणि कचेरी मार्गावर पादचारी पूल बांधून नागरीकांना ये-जा करण्यासाठी मार्ग मोकळा करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

विद्यार्थ्यांना तर रस्ता ओलांडताना तारेवरची कसरत करुन आणि जीव धोक्यात घालून रस्ता ओलांडत जावे लागते. तसेच रहदारी बंद होईपर्यंत बराच वेळ थांबावे लागते. बर्याच वेळा महिला आणि लहान मुलांना पोलिसांच्या मदतीने रस्ता सुरक्षितपणे पार करून पुढे जावे लागते.

सततच्या रहदारीमुळे दररोज छोटे मोठे अपघात होत असतात. या अपघातात अनेक जण जखमी झाले आहेत तर काही जणांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. त्यामुळे शहरात पादचारी पूल आणि सिग्नल यंत्रणा अत्यंत आवश्यक आहे असे दत्तात्रय शिंदे यांनी सांगितले.

माणगाव शहरातील लोकसंख्या, रहदारी, प्रवासी यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. कळमजे जोड रस्त्या जवळील महामार्गाचा बाह्य वळण मार्गाचे काम ठप्प झाले आहे. तेथील कळमजे पुलाचे कामही अद्यापही झालेले नाही. काळ नदीच्या पुलाचे बांधकाम गेली कासवगतीने सुरू आहे ते पूर्ण झाले नाही. तसेच कोकणात जाण्यासाठी अन्य जवळचा मार्ग नसल्याने सातत्याने शहरात वाहतुकीची कोंडी होत आहे. नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यासाठी पादचारी पूल किंवा ट्रॅफिक सिग्नल यंत्रणा तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# पहिल्या डावात भारताची पडझड

## ब्रिस्बेन कसोटीत तिसऱ्या दिवसाखेर ४ बाद ५१ धावा

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

ब्रिस्बेन येथील गाबा क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात फलंदाजांच्या ढिसाळ कामगिरीमुळे टीम इंडिया पुन्हा अडचणीत सापडलीये. तिसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियन संघाचा पहिला डाव ४४५ धावांवर आटोपल्यावर भारतीय संघाने आपल्या पहिल्या डावाला सुरुवात केली, पण एका बाजूला पावसाचा खेळ सुरू असताना दुसऱ्या बाजूला भारतीय फलंदाजांनी निराश केले.

सलामी जोडीत कोणताही बदल न करता यशस्वी जैस्वाल आणि लोकेश राहुल यांनी भारतीय संघाच्या डावाची सुरुवात केली. मिचेल स्टार्कच्या पहिल्याच चेंडूवर खणखणीत चौकार मारून यशस्वीने या डावात अपयशी ठरणार नाही या इराद्याने मैदानात उतरल्याचे संकेत दिले, पण दुसऱ्याच चेंडूवर स्टार्कने त्याला तंबूचा रस्ता दाखवला. पहिल्या षटकातच भारतीय संघाने अवघ्या चार धावांवर आपली पहिली विकेट गमावली. त्याची जागा घेण्यासाठी मैदानात उतरलेल्या शुबमन गिलच्या रूपात टीम इंडियाला स्टार्कने आणखी एक धक्का दिला. बॅक टू बॅक ओव्हरमध्ये त्याने दिलेल्या धक्क्यातून टीम इंडिया सावरलीच नाही.



आघाडीच्या फलंदाजीतील दोन विकेट्स गमावल्यावर सर्वांच्या नजरा या विराट कोहलीवर खिळल्या होत्या. ऑस्ट्रेलिया विरुद्ध शंभरावा कसोटी सामना खेळणारा विराट जोश हेजलवूडच्या गोलंदाजीवर फसला. त्याला दुहेरी आकडाही गाठता आला नाही. तो १६ चेंडूत अवघ्या तीन धावा करून परतला. पॅट कमिन्सने ऋषभ पंतचा खेळ खल्लास करत टीम इंडियाच टेन्शन आणखी वाढवले. भारतीय संघाने ४४ धावांवर आपल्या पहिल्या चार विकेट्स गमावल्या.

आघाडीच्या चार फलंदाजांनी तंबूचा रस्ता धरल्यावर आता संघाचा डाव सावरण्याची मोठी जबाबदारी लोकेश राहुल आणि रोहित शर्मा यांच्यावर आहे. सलामीला आलेल्या राहुलने कर्णधाराच्या साथीने पाचव्या विकेटसाठी १० धावांची भागीदारी केली. यातील नऊ धावा या राहुलने केल्या आहेत. तो ६४ चेंडूचा सामना करून चार चौकाराच्या मदतीने ३३ धावांवर नाबाद खेळत आहे, तर रोहित सहा चेंडू खेळूनही खाते उघडण्याच्या प्रतिक्षेत आहे.

पावसाच्या बॅटिंगमुळे टीम इंडियाला बॅटिंगसाठी खूपच कमी वेळ मिळाला. त्यातही आघाडीच्या चौघांनी अगदी स्वस्तात तंबूचा रस्ता धरला. परिणामी पावसाच्या सातत्यपूर्ण व्यत्ययामुळे भारतीय संघाच्या पहिल्या डावात फक्त १७ षटकांचा खेळ झाला. यात कुणालाच मैदानात तग धरण्याची हौस दिसली नाही. त्यामुळे पाऊस पडला तेच बरे अशी म्हणायची वेळ आली आहे. या मालिकेतील पहिला सामना भारताने जिंकला, तर ऑस्ट्रेलियाने दुसरी कसोटी जिंकून बरोबरी केली आहे.




# भारतीय महिला हॉकी संघाने आशिया चषक जिंकला

**मस्कत : वृत्तसंस्था**

गोलरक्षक निधीच्या अप्रतिम कामगिरीच्या जोरावर भारतीय मुलींच्या संघाने कनिष्ठ गटाच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. अंतिम सामन्यातील १-१ अशा बरोबरीनंतर भारताने चीनचा शूटआऊटमध्ये ३-२ असा पराभव केला. या कामगिरीने भारतीय मुलींच्या संघाने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले.

नियोजित वेळेतही चीनच्या आक्रमणे रोखून धरताना निधीने सामना बरोबरीत सोडवला. जिनझुआंगने ३०व्या मिनिटाला चीनचे खाते उघडले. त्यानंतर उत्तरार्धात ४१व्या मिनिटाला कनिका सिवचने भारताला बरोबरी साधून दिली. शूटआऊटमध्ये साक्षी राणाने भारताची पहिली संधी यशस्वी केली. त्यानंतर निधीने चीनचा पहिलाच प्रयत्न फोल ठरवला, मात्र भारताच्या मुमताज खानचाही प्रयत्न अयशस्वी ठरला. हाओ गुओटिंगने चीनला बरोबरी साधून दिली. भारताच्या सुनेलिता टोप्पोने अखेरची संधी साधून भारताचा विजय साकार केला.

# केन विल्यमसनने घडवला इतिहास | एकाच मैदानावर सलग पाच शतके ठोकली

**हॅमिल्टन : वृत्तसंस्था**

न्यूझीलंड वि इंग्लंड तिसऱ्या कसोटीत केन विल्यमसनने इतिहास घडवला आहे. 'किवी' फलंदाज विल्यमसनने कसोटीत ३३वे शतक झळकावले आहे. विल्यमसनचे शतक आणि इतर फलंदाजांच्या महत्त्वपूर्ण धावसंख्येच्या जोरावर दुसऱ्या डावात ४५३ धावा केल्या. यासह न्यूझीलंडने ६५८ धावांची अभेद्य आघाडी मिळवली आहे.

तिसऱ्या कसोटी सामन्यात केन विल्यमसनने २०४ चेंडूत २० चौकार आणि एका षटकारासह १५६ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या सामन्यात शतक पूर्ण करून विल्यमसन कसोटी क्रिकेटच्या १४७ वर्षांच्या इतिहासात एकाच मैदानावर सलग पाच सामन्यांमध्ये शतक करणारा पहिला क्रिकेटपटू ठरला. हॅमिल्टन येथील सेडॉन पार्कमध्ये त्याने ही कामगिरी केली. हा किवी फलंदाज तिसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या डावात १५६ धावांवर बाद झाला.



विल्यमसनने हॅमिल्टमनमधील मैदानावर कायमच उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या सामन्यापूर्वी त्याने या मैदानावर २०१९मध्ये बांगलादेशविरुद्ध २०० धावा, २०१९मध्ये इंग्लंडविरुद्ध १०४ धावा, २०२०मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध २५१ धावा आणि य ावर्षी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १३३* धावा केल्या होत्या.

विल्यमसन विशिष्ट मैदानावर १००पेक्षा जास्त सरासरी असलेल्या खेळाडूंच्या क्लबमध्ये सहभागी होण्याच्या मार्गावर आहे. आतापर्यंत कोणत्याही एका मैदानावर १००पेक्षा जास्त सरासरीने धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये ऑस्ट्रेलियाचे डॉन ब्रॅडमन अव्वल स्थानी आहेत, ज्यांनी मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर १२८.५३ च्या जोरदार सरासरीने धावा केल्या आहेत. भारताचा व्हीव्हीएस लक्ष्मण या यादीत दुसऱ्या स्थानावर आहेत, ज्याने कोलकाता येथील ईडन गार्डन मैदानावर ११०.६३च्या सरासरीने धावा करण्याचा विक्रम केला आहे. बार्बाडोसमधील किंग्स्टन ओव्हलवर १०४.१५ च्या सरासरीने धावा करणाऱ्या कोणत्याही एका मैदानावर १००पेक्षा जास्त सरासरीने धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये गारफिल्ड सोबर्सचे नावदेखील समाविष्ट आहे.

या शतकाच्या जोरावर विल्यमसन आता एकाच मैदानावर सर्वाधिक शतके झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत सहभागी झाला आहे. या बाबतीत त्याने मायकेल क्लार्क (डलेड), जो रूट (लॉर्ड्स) आणि महेला जयवर्धने (गॉल) या महान खेळाडूंची बरोबरी केली आहे. विल्यमसनपेक्षा जयवर्धने (११, कोलंबो एसएससी), ब्रॅडमन (९, मेलबर्न), जॅक कॅलिस (९, केपटाऊन) आणि कुमार संगकारा (८, कोलंबो एसएससी) यांनी एकाच मैदानावर अधिक शतके झळकावली आहेत.

# बुमराहवर वर्णभेदात्मक टिप्पणी करणाऱ्या महिला कमेंटेटरने मागितली माफी

**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह ऑस्ट्रेलियामध्ये जबरदस्त कामगिरी करत आहे. त्याने तिसऱ्या कसोटीत सहा विकेट्स घेत एकट्याने ऑस्ट्रेलियाच्या अर्ध्या संघाला तंबूत धाडले, पण या कसोटीदरम्यान बुमराहवर वर्णभेदात्मक टिप्पणी करण्यात आली. गाबा कसोटीच्या दुसऱ्या दिवशी इंग्लंडचा माजी क्रिकेटपटू आणि फॉक्स स्पोर्ट्सची समालोचक इसा गुहा हिने त्याच्यावर जातीय टीका केली. यानंतर हे प्रकरण तापले. त्यामुळे आता या महिला समालोचकाने बुमराहची माफी मागितली आहे.



इसा गुहाने समालोचन करताना बुमराहसाठी प्राइमेट हा शब्द वापरला होता, ज्याचा अर्थ माकड असाही होतो. गाबा कसोटीच्या तिसऱ्या दिवसाचा खेळ सुरू होताच ईसाने माफी मागितली. ती म्हणाली, रविवारी समालोचन करताना मी एक शब्द वापरला, ज्याचे अनेक अर्थ आहेत. सर्वप्रथम मी माफी मागते. जर मी काही चुकीचे बोलली किंवा कोणाला दुखावले असेल तर माफी मागते. मी सर्वांचा आदर करते.

# मुंबईच्या जेतेपदामध्ये सूर्यांश शेडगेची निर्णायक खेळी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

एकापेक्षा एक धुरंधर फलंदाज तंबूत परतलेले असताना सूर्यांश शेडगेने दडपणाच्या स्थितीत १५ चेंडूत ३६ खेळी करत मुंबईला सय्यद मुश्ताक अली स्पर्धेचे जेतेपद मिळवून दिले. मुंबईने मध्य प्रदेशला पाच विकेट्स आणि १३ चेंडू राखून नमवत जेतेपद पटकावले. १७५ धावांच्या लक्ष्यासमोर खेळताना मुंबईची अवस्था १२९/५ अशी झाली होती. यानंतर सूर्यांशने सूत्रे हाती घेतली.

सूर्यांश याने १५ चेंडूत तीन चौकार आणि तीन षटकारांसह नाबाद ३६ धावांची खेळी केली. त्याला अथर्व अंकोलेकरने सहा चेंडूत दोन षटकारांसह १६ धावांची खेळी करत उत्तम साथ दिली. या दोघांनी सहाव्या विकेटसाठी १९ चेंडूत ५१ धावांची खणखणीत भागीदारी केली.

बंगळुरूतील एम.चिन्नास्वामी स्टेडियमवर मुंबईचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. शार्दूल ठाकूरने मध्य प्रदेशच्या सलामीवीरांना झटपट माघारी धाडले.



सुभ्रांशू सेनापती आणि हरप्रीत सिंग यांनाही मोठी खेळी करण्यात अपयश आले. वेंकटेश अय्यरने १७ धावांचे योगदान दिले, तर मध्य प्रदेशचा कर्णधार रजत पाटीदारने ४० चेंडूत सहा चौकार आणि सहा षटकारांसह नाबाद ८१ धावांची तडाखेबंद खेळी केली. मुंबईतर्फे शार्दूल ठाकूर आणि रॉयस्टन डायस यांनी प्रत्येकी दोन विकेट्स पटकावल्या.

प्रत्युत्तरादाखल खेळताना मुंबईने पृथ्वी शॉ याला झटपट गमावले. पृथ्वीने १० धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यर १६ धावा करून तंबूत परतला. संपूर्ण स्पर्धेत झंझावाती फॉर्ममध्ये असणाऱ्या अजिंक्य रहाणेने सूर्यकुमार यादवच्या साथीने डाव सावरला. रहाणेने ३० चेंडूत ३७ धावा केल्या, तर सूर्याने ३५ चेंडूत चार चौकार आणि तीन षटकारांसह ४८ धावांची खेळी केली. यानंतर सूर्यकुमारच्या विकेटमुळे मुंबईचा संघ अडचणीत सापडला होता, परंतु सूर्यांशने आक्रमक खेळी साकारत मुंबईच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

### सय्यद मुश्ताक अली स्पर्धेवर रहाणेची छाप

मुंबईने या स्पर्धेसाठी श्रेयस अय्यरकडे नेतृत्व सोपवले होते. आयपीएल जेतेपद पटकावणाऱ्या केकेआर संघाचे नेतृत्व करणाऱ्या श्रेयसने मुंबईलाही जेतेपद मिळवून दिले. दोन वर्षांपूर्वी अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वात मुंबईने सय्यद मुश्ताक अली स्पर्धेचे जेतेपद पटकावले होते. रहाणेने यंदाच्या स्पर्धेत सर्वाधिक ४६९ धावा केल्या. यात त्याने स्पर्धेत पाच अर्धशतकी खेळी साकारल्या. रहाणेलाच मालिकावीर पुरस्काराने गौरवण्यात आले, तर चंदीगढच्या जगजीत सिंगने स्पर्धेत सर्वाधिक १८ विकेट्स पटकावल्या.

# भारतीय महिला क्रिकेट संघाचा पाकवर विजय

**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

भारताने फिरकीपटू सोनम यादवचे चार बळी आणि जी. कामिलिनीच्या फलंदाजीच्या जोरावर १९ वर्षांखालील महिला टी-२० आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत अ गटातील सामन्यात रविवारी पाकिस्तानवर नऊ गडी राखून दणदणीत विजय मिळवला.



१७ वर्षीय डावखुरी फिरकीपटू सोनमने सहा धावांत चार गडी बाद करत आंतरराष्ट्रीय पातळीवरील आपली सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. त्यामुळे भारताने पाकिस्तानला २० षटकांत सात बाद ६७ धावांवर रोखले. भारताने कामिलिनी हिच्या २९ चेंडूतील ४४ धावांच्या जोरावर ७.५ षटकांत एक बाद ६८ धावा करत विजय साकारला. नाणेफेक जिंकून फलंदाजीसाठी उतरलेल्या पाकिस्तानकडून केवळ कोमल खान (२४) आणि फातिमा खान (११) यांनाच दुहेरी आकडा गाठता आला.

# महिला टीम इंडियाची विजयी सलामी; विंडीजवर मात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय महिला संघाने सांघिक खेळाचे प्रदर्शन करताना पहिल्या टी-२० सामन्यात वेस्ट इंडिजला ४९ धावांनी नमवले. या शानदार विजयासह भारतीयांनी तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

डी.वाय. पाटील स्टेडियमवर प्रथम फलंदाजीचे निमंत्रण मिळालेल्या भारताने स्मृती मानधना आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांच्या अर्धशतकांच्या जोरावर २० षटकांत ४ बाद १९५ धावा उभारल्या. यानंतर वेस्ट इंडिजला २० षटकांत सात बाद १४६ धावांवर रोखत भारतीयांनी विजय मिळवला. विंडीजकडून किआना जोसेफ आणि डेंड्रा डॉट्टिन यांनी फटकेबाजी केली. जोसेफने ४९, तर डॉट्टिनने ५२ धावांचा तडाखा दिला. इतर फलंदाज अपयशी ठरल्याने दोघींची झुंज व्यर्थ ठरली. भारताकडून टिटास साधूने तीन, तर दीप्ती शर्मा व राधा यादव यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.



त्याआधी भारताकडून स्मृतीने ३३ चेंडूंत ५४, तर जेमिमाने ३५ चेंडूंत ७३ धावा केल्या. स्मृती आणि उमा छेत्री (२४) यांनी ५० धावांची सलामी दिली. स्मृतीने जेमिमासोबत ८१ धावा जोडल्या. जीवदान मिळाल्यावर स्मृती मानधनाने २८वे आंतरराष्ट्रीय टी-२० अर्धशतक झळकावले.

स्मृतीने महिला आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये ३.६२२ धावांसह सर्वाधिक धावा काढणाऱ्यांमध्ये दुसरे स्थान मिळवत कर्णधार हरमनप्रीत कौरला (३५८९) मागे टाकले. न्यूझीलंडची सूझी बेट्स (४५८४) अव्वलस्थानी कायम. जेमिमा रॉड्रिग्जने १२वे आंतरराष्ट्रीय टी-२० अर्धशतक झळकावले.

**धावफलक**

भारत : २० षटकांत ४ बाद १९५ धावा (जेमिमा रॉड्रिग्ज ७३, स्मृती मानधना ५४, उमा छेत्री २४: करिष्मा रामहारॅक २/१८.) वि. वि. वेस्ट इंडिज : २० षटकांत ७ बाद १४६ धावा (डेंड्रा डॉट्टिन ५२, किआना जोसेफ ४९; टिटास साधू ३/३७, दीप्ती शर्मा २/२१, राधा यादव २/२८).

# द. आफ्रिका-इंग्लंड कसोटी सामना डीआरएसशिवाय खेळवला जाणार

**ब्लोमफॉन्टेन : वृत्तसंस्था**

सध्या क्रिकेट सामन्यांमध्ये डीआरएस डिसीजन रिव्ह्यू सिस्टीमला खूप महत्त्व आहे. सामन्याचा रोख बदलण्यासाठी एक विकेट खूप महत्त्वाची असते. त्यामुळे डीआरएसचा सामन्यात मोठा फायदा असतो, पण आता एका कसोटी सामन्यात डीआरएसचा वापरच होणार नाही आहे. डीआरएशिवाय हा कसोटी सामना खेळवला जाणार आहे.




दक्षिण आफ्रिकेचा महिला संघ २२ वर्षांनंतर घरच्या मैदानावर कसोटी सामना खेळणार असून त्यात डीआरएस नसणार आहे. आफ्रिका महिला संघ इंग्लंड महिला संघादरम्यान एकमेव कसोटी खेळणार आहे. उभय संघांमधील सामना ब्लोमफॉन्टेन येथे होणार आहे. वृत्तानुसार कसोटी सामन्यापूर्वी दोन्ही संघांमध्ये तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामन्यांची मालिका होती, ज्यामध्ये डीआरएसचा वापर करण्यात आला होता. हे तंत्रज्ञान खूप महाग आहे आणि या कारणास्तव कसोटीमध्ये वापरले जाणार नाही.

क्रिकेट दक्षिण आफ्रिकेने केवळ एकदिवसीय आणि टी-२० सामन्यांसाठी डीआरएस तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे, कारण टी-२० रँकिंग आणि महिला चॅम्पियनशिपच्या दृष्टीने टी-२० आणि एकदिवसीय सामने त्यांच्यासाठी महत्त्वाचे आहेत. दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रीय संघ आणि उच्च कार्यप्रदर्शन संचालक एनोक एनक्वे म्हणाले की, सध्याच्या महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटा जास्त महत्त्व असल्यामुळे संसाधने मर्यादित षटकांच्या क्रिकेटसाठी वापरली जात आहेत .

दक्षिण आफ्रिकेचा महिला संघ इंग्लंडविरुद्धच्या मालिकेपूर्वीच एकदिवसीय विश्वचषकासाठी पात्र ठरला होता, पण त्यांचे लक्ष्य महिला चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत अव्वल स्थानी राहण्याचे होते. सध्या संघ एकदिवसीय क्रमवारीत चौथ्या आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत पाचव्या स्थानावर आहेत. इंग्लंडविरुद्ध खेळल्या गेलेल्या मालिकेत डीआरएसमध्ये बिघाड झाला होता.

पहिल्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या लक्ष्याचा पाठलाग करताना लॉरेन बेलचा चेंडू ताजमीन ब्रिट्सच्या पॅडला लागला आणि तिला पायचीत असल्याने बाद घोषित करण्यात आले. तिला रिव्ह्यू घ्यायचा होता, पण तांत्रिक बिघाडामुळे ती रिव्ह्यू घेऊ शकली नाही.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com